- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,६२,७०० /-
- २३ कॅरेट : १,५८,३५० /-
- चांदी : २,४४,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५५ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

## भीषण रस्ते अपघात, ४ ठार

**सारण:** बिहारमधील छपरा येथे रविवारी उशिरा सायंकाळी एक भीषण रस्ते अपघात झाला. छपरा-मुजफ्फरपूर महामार्गावर भेल्दी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोनहो टोल प्लाझाजवळ ही घटना घडली. भरधाव वेगाने येणाऱ्या १८ चाकी हायवा ट्रकची इलेक्ट्रिक रिक्षासोबत समोरासमोर धडक झाली आणि ट्रकने टोटोला पूर्णपणे चिरडले. या दुर्दैवी अपघातात एकूण चार जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अमनूरमधील सुलतानगंज येथील रहिवासी फारुख मियाँ (वय ६०) आणि त्यांची सून शाहिदा खातून (वय ३५) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त फारुख मियाँ यांची १३ वर्षांची नात शाना परवीन आणि सुरेश पंडित (वय ४५) या वाटसरूचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमी झालेले तिघेही एकाच कुटुंबातील आहेत. यामध्ये इरशाद (इब्राहिम मियाँ यांचा मुलगा), दिलशाद अन्सारी (इलियास अन्सारी यांचा मुलगा) आणि जुनैद अन्सारी (आलमगीर अन्सारी यांचा मुलगा) यांचा समावेश आहे. स्थानिकांच्या मदतीने सर्व जखमींना उपचारासाठी मेकर कम्युनिटी हेल्थ सेंटरमध्ये दाखल करण्यात आले.
कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, फारुख मियाँ यांच्या उपचारासाठी संपूर्ण कुटुंब टोटोने गरखा येथे गेले होते. परत येत असताना, टोल प्लाझाजवळ मेकरच्या दिशेने येणाऱ्या एका अनियंत्रित हायवा ट्रकची टोटोला समोरासमोर धडक बसली. धडक इतकी जोरदार होती की टोटोचा चक्काचूर झाला आणि हायवा ट्रक ११,००० व्होल्टच्या लोखंडी वीज खांबावर जाऊन आदळला.

# नागपुरात गॅस गळतीचा थरार....





**गोधनी ग्रामपंचायत परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्लांटमध्ये क्लोरिन गॅसची गळती**

**४० हुन अधिक लोकांना मळमळ, मध्यारात्री १ वाजताची घटना**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरच्या गोधनी ग्रामपंचायत परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्लांटमध्ये क्लोरिन गॅसची गळती झाल्याची घटना घडली आहे. रविवारी मध्यरात्री तीनच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती आहे. घटना घडल्यानंतर या प्लांटच्या २०० मीटर पर्यंतचा परिसर रिकामा करण्यात आला आहे. तर या गॅस गळतीमुळे ४० हुन अधिक लोकांना मळमळ आणि उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. तर १५ पेक्षा जास्त लोकांना श्वास घ्यायला त्रास होत असल्याने त्यांच्यावरही रुग्णालयात सध्या उपचार सुरू करण्यात आले.
दुसरीकडे घटनास्थळी एनडीआरएफ पथकाकडून आणि महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून बचाव कार्य सुरू करण्यात आले. पोलिसांच्या मदतीने आजूबाजूच्या वस्तीतील लोकांना दूर निघून जाण्यास सूचना दिल्या. काही लोकांना उपचारार्थ स्पर्श हॉस्पिटल झिंगाबाई टाकळी तसेच मेयो रुग्णालयात घालविण्यात आले.
मनपा अग्निशमन विभाग आपले दोन वॉटर टेंडर तसेच ब्रीदिंग ऑपरेटर्स सह घटनास्थळी दाखल झाले. मदतीला ओसीडब्ल्यूचे कर्मचारी तथा एनडीआरएफ ची चमू बोलविण्यात आली. पहाटे ५.३० च्या सुमारास वाळू गळती कमी झाल्यावर क्लोरीन सिलेंडरला एनडीआरएफची चमू तथा अग्निशमन विभागाच्या जवानांच्या तसेच ओसीडब्ल्यूचे कर्मचाऱ्यांच्या मदतीने कॉस्टिक सोडा मिश्रित पाण्याच्या टाकीमध्ये टाकण्यात आलेले आहे.
नागपूरच्या गोधनी नगर परिषदेच्या सेंटरल ही घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात सध्या भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. तर ही गॅसगळती नेमकी कशी झाली हे अद्याप कळू शकलेलं नसून अग्निशमन विभागाकडून या संदर्भात तपास केला जात आहे.

### उपचारात कोणतीही कमतरता पडू देऊ नका : पालकमंत्री बावनकुळे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना तत्काळ सूचना देऊन उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. याचबरोबर आवश्यकता भासेल त्याप्रमाणे आरोग्य विभागाच्या इतर यंत्रणेलाही सतर्क करुन ठेवले होते. गळती होत असलेल्या सिलेंडरला पुर्णतः पाण्यामध्ये बुडवून ठेवण्यात आले व धोका नियंत्रीत करण्यात आला. आरोग्य संचालनालय, औद्योगिक सुरक्षा, एनडीआरएफचे पथक यांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वय साधून या दूर्घटनेवर संभाव्य धोक्यापासून बचाव केला. या गॅस गळतीमुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार एकूण ५६ व्यक्तींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी ११ व्यक्तींना उपचार करुन सुखरुप घरीही पोहचविण्यात आले आहे. सद्यस्थितीत ४५ व्यक्ती रुग्णालयात उपचार घेत असून त्यापैकी ८ व्यक्ती आयसीयुमध्ये उपचार घेत आहेत. रुग्णालय प्रशासन व आरोग्य विभागामार्फत घरोघरी जावून तपासणी व निरीक्षणे नोंदविण्यात आली आहे. तसेच उपचार घेत असलेल्यांना कुठल्याही प्रकारची कमतरता भासू नये असे निर्देशही नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

## अमरावतीच्या रुग्णालयात आग, तीन नवजात बालकांचा मृत्यू






**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशू कक्षात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही आग लागली. ही आग वेगाने पसरली. यानंतर रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले.
ही घटना घडली तेव्हा या कक्षात ९ बालके होती. मात्र, तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उर्वरित बालकांसह संपूर्ण नवजात शिशू कक्षातील इतर बालकांना जवळच असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेनंतर बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष आमदार रवी राणा यांनी रुग्णालय प्रशासनावर सडकून टीका केली.
मी सकाळी साडेतीन वाजल्यापासून डॉक्टर आणि इतर लोकांच्या संपर्कात आहे. या आधी तीन वर्षांपूर्वी अशीच आग लागली होती. तेव्हा जुन्या बिल्डिंगमधून नव्या इमारतीत शिफ्ट केलं, तिथे व्यवस्था करुन दिल्या. आज पुन्हा तशीच दुर्घटना झाली. हा रुग्णालयातील कर्मचारी, डॉक्टर आणि व्यवस्थेचा बेफिकीरपणा असल्याचा गंभीर आरोप आमदार रवी राणा यांनी केला.
नवजात बालकांचा अशाप्रकारे मृत्यू होणे दुर्दैवी घटना, याची चौकशी होईल, ज्या ज्या लोकांना जबाबदारीने दिली होती, त्यांनी ती सांभाळायला पाहिजे होती. जेव्हा आग लागली होती पूर्वी तेव्हा मी आणि मुख्यमंत्र्यांनी नवीन इमारतीत सगळ्या व्यवस्था दिल्या, त्रुटी दूर केल्या. जे जे डॉक्टर, नर्स यासाठी जबाबदार आहेत, यांच्यावर कारवाई केली जाईल. आरोग्यमंत्र्यांनी याकडे लक्ष दिलं पाहिजे. फायर ऑडिट झालं नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. फायरब्रिगेडची गाडीही लेट पोहोचली, त्यावरही मी स्वतः कारवाई करणार असल्याचे रवी राणा यांनी सांगितले.

## शेतकरी कर्जमाफीचा दुसरा हप्ता जारी



**वृत्तसंस्था, मुंबई**
महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील दुसरा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतून कर्जमाफीच्या दुसऱ्या हप्त्याच्या निधीचे वितरण करण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात ५०८६ कोटी रुपये वर्ग करत ६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
महायुती सरकारनं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्यानंतर पहिल्या टप्प्यात ७ ऑगस्टला ५०२९ कोटी वितरीत करत ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली होती. आज दुसऱ्या टप्प्यात ६ लाख ३६ हजार ३६ पात्र शेतकऱ्यांना ५०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. राज्य सरकारकडून कर्जमाफी योजनेसाठी टप्प्या टप्प्याने निधी वितरीत केला जात आहे. या कर्जमाफीमध्ये साधारणपणे ३२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाणार आहे. तर, २३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना होणं अपेक्षित आहे.

**आतापर्यंत किती शेतकऱ्यांची कर्जमाफी ?**

राज्य सरकाकडून आतापर्यंत दोन टप्प्यात १०११५ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ १२ लाख ५८ हजार २४३ शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. कर्जमाफीतील पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत असल्याची माहिती देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया अतिशय पारदर्शक असून मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत नियंत्रित केली जात आहे अशी माहिती देखील देण्यात आली आहे.

## राजुरात भरदिवसा गोळीबार, विनोद उर्फ पापा जाधव यांची हत्या



**दै. सिंहवाणी वृत्त, राजुरा**
राजुरा शहरात सोमवारी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास झालेल्या गोळीबाराच्या घटनेने एकच खळबळ उडाली. सोमनाथपूर वॉडार्तील रहिवासी विनोद उर्फ पापा जाधव याच्यावर दोन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात जाधव यांच्या डोक्याला गोळी लागल्याचे सांगण्यात येत असून, त्यांना गंभीर अवस्थेत उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, राजुरा शहरातील मुख्य मार्गावर प्रदीप बिअर बारच्या बाजूला असलेल्या नारळाच्या दुकानाजवळ ही घटना घडली. अचानक झालेल्या गोळीबारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.
गोळीबारानंतर जखमी अवस्थेत असलेल्या जाधव यांना नागरिकांनी तातडीने उचलून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.
घटनेची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी करून घटनेचा तपास सुरू केला आहे. गोळीबार करणारे दोन्ही संशयित घटनास्थळावरून फरार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध दिशेने तपास सुरू आहे. गोळीबाराचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पूर्ववैमनस्यातून हा हल्ला झाला की अन्य कोणत्या कारणातून, याचा तपास पोलीस करीत आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागात झालेल्या या गोळीबारामुळे राजुरात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## २८ ऑगस्टच्या आत निर्णय घ्या, आता सुटी नाही : मनोज जरांगे

**वृत्तसंस्था, बीड**
मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या २९ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या निर्णायक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला थेट आणि निवार्णीचा इशारा दिला आहे. आता मराठा समाजाला गोड बोलून फसवण्याचे दिवस संपले आहेत.
मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या वारंवार शिष्टमंडळे पाठवण्याच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली: सरकारचे शिष्टमंडळ आल्यावर काय बोलते ते पाहू. मात्र, मराठा समाजाला आणखी किती दिवस वेड्यात काढणार आहात, याची सरकारला लाज वाटली पाहिजे. प्रत्येक वेळी फक्त चचेर्ला यायचे आणि वेळ मागायचा, हे आता चालणार नाही. गेल्या ३ वर्षांत जी जी सरकारे आली, त्यांच्या प्रत्येक शब्दाचा आम्ही सन्मान ठेवला. मात्र, आता हा अन्याय सहन केला जाणार नाही. सरकारचे शिष्टमंडळ केवळ वेळकाढूपणा करण्यासाठी चर्चा करत आहे.



**नोंदी आणि गॅझेटची अंमलबजावणी करावीच लागेल**

ज्या मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांचे दाखले आणि हक्क सरकारला द्यावेच लागतील. हे सरकार आता अडवू शकत नाही. तसेच यासंदर्भातील गॅझेट लागू करावेच लागेल, हे आता सरकारच्याही लक्षात आले आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारने २८ऑगस्टपर्यंत निर्णय घेतला नाही, तर २९ ऑगस्टपासून नियोजित आंदोलन कोणत्याही परिस्थितीत मागे घेतले जाणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.
दरम्यान, जरांगे यांनी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही जोरदार टीका केली. मराठा समाजाच्या सापडलेल्या नोंदींचा आधार आणि त्यामागील घटनात्मक तरतुदी भुजबळ यांच्या लक्षात आल्याचा दावा त्यांनी केला. मराठा समाजाला विरोध करत राहिल्यास त्याचे राजकीय नुकसान होऊ शकते, अशी जाणीव भुजबळांना झाल्याचेही जरांगे म्हणाले. मराठ्यांना विरोध करून आपला काही फायदा नाही, अन्यथा अस्तित्व उद्ध्वस्त होईल, असा दावा त्यांनी केला.
मनोज जरांगे यांच्या टीकेच्या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी केलेले वक्तव्यही महत्त्वाचे ठरत आहे. भुजबळ यांनी यापूर्वी मराठा आंदोलनाबाबत भूमिका स्पष्ट करताना, जरांगे यांची लढाई आपल्या विरोधात नसल्याचे म्हटले होते. सरकार या विषयावर चर्चा करून निर्णय घेईल, असे भुजबळ यांनी सांगितले होते. ओबीसी समाजातील जातींची संख्या आणि जातगणनेच्या मागणीवरही सरकार काम करत असल्याचे त्यांनी म्हटले होते.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

दैनिक सिंहवाणी वृत्त

Epaper : epaper.sinhvani.com

दिनांक : मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६

संपादकीय लेखणीतून...

# मदर तेरेसा

आपले संपूर्ण आयुष्य भारतातील गरीब लोकांसाठी समर्पित करणाऱ्या मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी स्कोप्जे (आता मॅसेडोनियामध्ये) येथे एका अल्बेनियन कुटुंबात झाला. त्याचे वडील निकोला बोयाझू हे एक साधे व्यापारी होते. मदर तेरेसा यांचे खरे नाव 'अग्नेस गोंजा बोयाजीजू' होते. अल्बेनियन भाषेत गोंजा म्हणजे फुलांची कळी. त्या केवळ आठ वर्षांच्या असताना वडिलांचे निधन झाले, त्यानंतर तिच्या संगोपनाची सर्व जबाबदारी तिची आई द्राणा बोयाजू यांच्यावर आली. पाच भावंडांमध्ये ती सर्वात लहान होती. त्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली होती. त्याच्या जन्माच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी बैप्टाइज घेतला. ख्रिश्चनांमध्ये एक धार्मिक समारंभ असतो. म्हणूनच त्या २७ ऑगस्टला रोजी वाढदिवस साजरा करायच्या. मदर तेरेसा यांचे खरे नाव एग्नेस होते. त्यांनी आपले नाव सोडून तेरेसा हे नाव निवडले. त्या आपल्या नावाने संत थेरेसा ऑस्ट्रेलिया आणि टेरेसा ऑफ एव्हिला यांना सन्मान देऊ इच्छित होत्या. म्हणून त्यांनी टेरेसा हे नाव निवडले.

मदर तेरेसा यांनी वयाच्या १८ व्या वर्षी घर सोडले आणि केवळ घरच नाही तर देशही सोडला. त्या सिस्टर ऑफ लोरिटोयाशी जुळल्या आणि यासाठी आयर्लंडला गेल्या होत्या. यानंतर, जोपर्यंत त्या जिवंत राहिल्या आपल्या कुटुंबातील सदस्यांना भेटल्या देखील नाही. आयर्लंडमध्ये त्यांनी इंग्रजी शिकण्यासाठी कठोर परिश्रम केले आणि नंतर जानेवारी १९२० मध्ये त्या भारतात आल्या. जिथे त्यांनी पदवीनंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांसाठी काम करण्याचा निर्णय घेतला, त्यांनी १९३१ मध्ये नन्सचे कठोर प्रशिक्षण घेतले आणि कोलकाताच्या शाळांमध्ये काम सुरू केले. मदर तेरेसा यांनी प्रथम सेंट मॅरेजमध्ये इतिहास शिकवणे सुरू केले आणि तेथे १५ वर्षे वास्तव्य केले. गरीबांची अवस्था पाहून त्यांना खूप वाईट वाटले. १९४६ मध्ये दार्जिलिंगच्या रिट्रीट दरम्यान त्यांनी सांगितले की त्यांना या देशातील गरीब लोकांना मदत करण्यासाठी देवाचा संदेश मिळाला आहे. त्याचे काम पूर्ण करण्यासाठी त्याला दोन वर्षे लागली. त्यांनी नर्सिंगचा कोर्स केला. त्यानंतर त्यांनी लोकांना मदत करण्यास सुरुवात केली.

मदर तेरेसा जेव्हा सेवेच्या क्षेत्रात आल्या, तेव्हा त्यांनी लोकांमध्ये सहजपणे जगता यावे म्हणून आपलं ड्रेस बदलून साडी निवडली. त्यांना पूर्वीपासूनच सोपे जीवन जगण्याची सवय होती, परंतु त्यांना झोपडीत राहावे लागले आणि भीक मागून त्यांनी लोकांना खायला दिले. त्याला पुन्हा कॉन्व्हेंटमध्ये परत जावेसे वाटले कारण झोपडपट्टीचे जीवन खूप कठीण होते. पण त्या टिकून राहिल्या आणि कुष्ठरोग, प्लेग इत्यादी रोगांच्या रुग्णांना मदतही केली. १९४८ च्या युगात भारत इतक्या चांगल्या स्थितीत नव्हता की अशा परिस्थितीत गरीबांना कोणीही व्यवस्थित ठेवण्यास सक्षम होते. मदर तेरेसा या रोमन कॅथोलिक नन होत्या ज्यांनी आपले आयुष्य गरीब आणि गरजूंना मदत करण्यात घालवले. त्यांनी त्यांचे बहुतेक आयुष्य कलचुटा येथे व्यतीत केले, जिथे त्यांनी अनेक सामाजिक संस्था देखील स्थापन केल्या. तेरेसा यांना १९७९ मध्येच शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला आणि तेव्हापासून त्या खूप लोकप्रिय झाल्या. त्यांची देवावर नितांत श्रद्धा होती. त्याच्याकडे जास्त पैसा किंवा संपत्ती नव्हती परंतु त्याच्याकडे एकाग्रता, विश्वास, विश्वास आणि ऊर्जा होती ज्यामुळे त्याला गरीब लोकांना मदत करण्यात आनंद झाला. गरीब लोकांची काळजी घेण्यासाठी ती अनवाणी पायी चालत रस्त्यांवरून लांबचे अंतर कापत असे. सततची मेहनत आणि परिश्रम तिला कंटाळले होते, तरीही तिने हार मानली नाही.

मदर तेरेसा यांनी १९४७ मध्येच भारताचे नागरिकत्व घेतले होते, त्या बंगाली अस्खलितपणे बोलत होत्या, मदर तेरेसा यांनी अनेकदा चमत्कार केल्याचे सांगितले जाते. एक फ्रेंच मुलगी कार अपघातात जखमी झाल्यावर मदर तेरेसा यांच्या पदकाला स्पर्श केल्याने तिच्या बरगड्या बरे झाल्या असे तिने सांगितले होते. त्याचवेळी, पॅलेस्टिनी मुलीने सांगितले की मदर तेरेसा यांना स्वप्नात पाहिल्यानंतर ती हाडांच्या कर्करोगातून बरी झाली. भारताच्या मोनिका बेसरा यांनी दावा केला की तिचा कर्करोग मदर तेरेसा यांनी बरा केला होता, तिने एका मुलाखतीत सांगितले होते की एकदा ती मिशनरीज ऑफ चॅरिटी कडून घरी गेल्यावर तिला ताप, डोकेदुखी, उलट्या आणि ओटीपोटात सूज आली, तपासणी केल्यावर, अहवालानुसार, बेसराला कर्करोगाच्या ट्यूमरपासून त्रास होत होता. ५ सप्टेंबर रोजी, बेसरा मिशनरीज ऑफ चॅरिटी चॅपलमध्ये प्रार्थना करत असताना, तिला मदर तेरेसा यांच्या चित्रातून प्रकाश दिसला. नंतर, मदर तेरेसा यांच्या पार्थिवाला स्पर्श करणारा एक पदक बेसराच्या पोटावर ठेवण्यात आला, जेव्हा बसरा दुसऱ्या दिवशी उठली तेव्हा तिचं ट्यूमर गायब झालं होतं. वैद्यकीय तपासणीत असे दिसून आले की ओटीपोटाचे वस्तुमान आता राहिले नाही आणि तिने पाहिलेले डॉक्टरांनी सहमती दर्शविली की बेसराला यापुढे शस्त्रक्रियेची गरज नाही.

भारतातील मानवतावादी कायार्साठी त्यांना १९७० मध्ये नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला. मदर तेरेसा यांनी मुलांना मदत करण्यासाठी नोबेल पुरस्कारासह प्राप्त १,३८,४२,९१२ रुपये दान केली होती. भारत सरकारने १९८० मध्ये त्यांना भारत रत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित केले. वाढत्या वयाबरोबर त्यांची प्रकृतीही खालावत गेली. १९८३ मध्ये वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांना पहिला हृदयविकाराचा झटका आला. त्यावेळी मदर तेरेसा पोप जॉन पॉल क्कयांना भेटण्यासाठी रोमला गेल्या होत्या. त्यानंतर १९८९ मध्ये त्यांना दुसरा हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांना कृत्रिम पेसमेकर बसवण्यात आला. १९९१ मध्ये मेक्सिकोमध्ये न्यूमोनिया झाल्यानंतर त्यांच्या हृदयाच्या समस्या आणखी वाढल्या. यानंतर त्यांची प्रकृती खालावत गेली. १३ मार्च १९९७ रोजी त्यांनी 'मिशनरीज ऑफ चॅरिटी'चे प्रमुख पद सोडले आणि ५ सप्टेंबर १९९७ रोजी त्यांचे निधन झाले.

# काँग्रेसच्या केंद्र सरकारवर आक्रमक पवित्रा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

२०२४ च्या लोकसभा निवडणुका नंतर काँग्रेस पक्ष केंद्रातील एन डी ए सरकारवर हावी होत आहे , असा एक विचार प्रवाह समोर येत आहे.

केंद्रातील एनडीए सरकारवर विरोधी पक्ष काँग्रेस पूर्णपणे 'हावी' झाला आहे असे म्हणता येणार नाही, परंतु २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीने संसदेत आणि संसदेबाहेर सरकारला मजबूत आव्हान नक्कीच दिले आहे.

केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारविरोधात काँग्रेसने लोकसभेत आणि संसदेबाहेर प्रचंड आक्रमक पवित्रा घेतला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे मुख्य विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस अधिक आक्रमक झाली असून, 'इंडिया' आघाडीच्या साथीने विविध मुद्द्यांवरून मोदी सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान मोदींच्या परराष्ट्र धोरणांवर आणि विशेषतः अमेरिका व इतर देशांशी होणाऱ्या व्यापारी करारांवरून प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे, ज्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते असा आरोप त्यांनी केला. संसदेत आणि जाहीर सभांमध्ये काँग्रेसने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची आणि आदिवासी व मागासवर्गीयांना जल-जंगल-जमिनीचे घटनात्मक हक्क देण्याची मागणी लावून धरली आहे.

**राहुल गांधी यांची बदललेली भूमिका आणि प्रतिमा:**

सशक्त विरोधी पक्षनेतेः लोकसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी सातत्याने थेट आक्रमक भाषणे करत सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण केली आहे. संसदेत पंतप्रधान आणि गृहमंत्री अमित शाह यांना थेट प्रश्न विचारण्याची त्यांची आक्रमक शैली पक्षाला नवा आत्मविश्वास देत आहे.

'इंडिया' आघाडीतील उत्तम समन्वयः पूर्वीच्या 'मोठ्या भावाच्या' भूमिकेऐवजी काँग्रेसने आता प्रादेशिक पक्षांसोबत नम्रता आणि लवचिकतेची रणनीती स्वीकारली आहे. यामुळेच संसद भवनाच्या मकरद्वार परिसरात प्रियांका गांधी आणि इतर विरोधी खासदारांनी मिळून एनडीए सरकारविरोधात एकत्रित मोठी निदर्शने केली केंद्रातील एनडीए सरकारविरोधात काँग्रेस पक्षाने आक्रमक पवित्रा घेत बेरोजगारी, पेपरफुटी, अग्निवीर योजना आणि संविधान टिकवण्याच्या मुद्यांवर देशभरातून व संसदेत जोरदार आक्रमक धोरण स्वीकारले आहे.

नीटपेपरफुटी, बेरोजगारी आणि अग्निवीर योजनेतील त्रुटींवरून काँग्रेसने सरकारला धारेवर धरले आहे. राहुल गांधींनी युवकांशी थेट संवाद साधत रस्त्यावर उतरून निदर्शने केली आहेत. 'संविधान धोक्यात आहे' हा संदेश तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचवण्यात काँग्रेसला यश आले असून, यामुळे सत्ताधारी भाजपवर राजकीय दबाव वाढला आहे.

विरोधी पक्षांना एकत्र घेऊन राहुल गांधी आणि काँग्रेस नेतृत्वाने संसदेत आणि संसदेबाहेर एनडीए सरकारविरोधात एकसंधपणे आघाडी उघडली आहे.

लोकसभेत राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेते पद स्वीकारल्यापासून काँग्रेस अत्यंत आक्रमक झाली आहे. पूर्वीच्या तुलनेत (२०१४ आणि २०१९) काँग्रेसच्या जागा ९९ पर्यंत वाढल्याने त्यांना संसदेत अधिक वजन प्राप्त झाले आहे. सीमांकन विधेयक आणि महिला आरक्षण व इतर महत्त्वाच्या घटनादुरुस्ती विधेयकांवर काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे सरकारला अनेकदा बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला आहे किंवा ती विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावी लागली आहेत. एप्रिल २०२६ मध्ये संसदेत मांडण्यात आलेले 'संविधान (१३१ वी घटनादुरुस्ती) व सीमांकन विधेयक' आवश्यक दोन तृतीयांश बहुमत न मिळाल्यामुळे लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही.

सरकारने महिला आरक्षणा (३३% कोटा) चे विधेयक सीमांकन प्रक्रियेशी जोडले आहे. परंतु, विरोधकांची ठाम मागणी आहे की महिला आरक्षण कोणत्याही विलंबविना विद्यमान ५४३ लोकसभा जागांच्या आधारावरच तातडीने लागू करावे.

लोकसंख्येच्या आधारावर लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केल्यास, ज्या राज्यांनी यशस्वीपणे लोकसंख्या नियंत्रण केले आहे (विशेषतः दक्षिण भारतातील राज्ये) त्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व आणि राजकीय वजन कमी होईल, असा आक्रमक आक्षेप काँग्रेससह द्रमुक आणि इतर विरोधी पक्षांनी घेतला आहे.

दोन तृतीयांश बहुमताचा पेचः संविधान संशोधन विधेयकांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगी आवश्यक असणारे विशेष बहुमत मिळवणे सरकारसाठी सोपे राहिलेले नाही. विरोधकांच्या कडाडून विरोधामुळे सरकारला माघार घ्यावी लागल्याचे किंवा संख्याबळाचा अभाव असल्याने विधेयके रोखली गेल्याचे प्रसंग घडले आहेत. अनेक संवेदनशील व आक्षेपास्पद विधेयकांवर संसदेत तीव्र मतभेद निर्माण झाल्यानंतर ती विधेयके सखोल छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची पाळी सरकारवर आली आहे. महिला आरक्षण आणि सीमांकन जोडणीः महिला आरक्षणाशी संबंधित कायद्याची अंमलबजावणी परिसीमन प्रक्रियेशी जोडल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठे मतभेद निर्माण झाले. विरोधकांनी या मुद्द्यावर सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला असून संघर्षाचे वातावरण कायम आहे. लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव आणण्यासाठी स्वाक्षऱ्या गोळा करण्यासारख्या पावलांमुळे विरोधक पूर्वीपेक्षा अधिक संघटित आणि आक्रमक दिसत आहेत.

**एनडीए सरकारची मजबूत बाजू:**

भाजप आणि एनडीएचा पलटवारः काँग्रेसच्या या वाढत्या हल्ल्यांना उत्तर देताना एनडीए आणि भाजपही तितकेच आक्रमक झाले. भाजपचे बहुमत व प्रादेशिक विस्तारः संसदेत काँग्रेसचा प्रभाव वाढला असला, तरी केंद्रात एनडीए सरकार तेलुगु देसम पार्टी आणि जनता दल युनायटेड च्या पाठिंब्याने स्थिर आहे.

राज्यांवरील पकडः देशातील बहुतांश राज्यांमध्ये (जवळपास २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश) आजही भाजप आणि एनडीएची सत्ता आहे, तर काँग्रेस किंवा 'इंडिया' आघाडीची सत्ता मोजक्याच राज्यांमध्ये मर्यादित आहे.

राज्यसभेत वाढती ताकदः इतर पक्षांमधून झालेल्या पक्षांतरामुळे (उदा. आप पक्षातील काही खासदारांचे निर्गमन) राज्यसभेत एनडीएची ताकद सातत्याने वाढत असून ते बहुमताच्या जवळ पोहोचले आहेत, ज्यामुळे सरकारला कायदे मंजूर करणे सोपे झाले आहे.

राष्ट्रवादाचा मुद्दाः संसदेत आणि सार्वजनिक मंचांवर 'वंदे मातरम' गीताच्या मुद्द्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपने काँग्रेसवर "देशविरोधी मानसिकता" आणि "तुष्टीकरणाचे राजकारण" करत असल्याचा थेट आरोप केला आहे.

राजकीय वर्चस्वः नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांचे संदर्भ देत भाजपने स्पष्ट केले आहे की, देशातील २२ राज्यांमध्ये आजही एनडीएचे मजबूत सरकार आहे. काँग्रेस केवळ संसदेत गोंधळ घालून कामकाज विस्कळीत करत असल्याचा आरोप एनडीएच्या नेत्यांनी केला आहे. या सर्व घडामोडींवरून स्पष्ट होते की, आगामी काळातील विधानसभा निवडणुका आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात काँग्रेस आपला हा आक्रमक पवित्रा कायम ठेवून एनडीए सरकारसमोरील आव्हाने वाढवण्याच्या तयारीत आहे.

काँग्रेससमोरील आव्हानेः प्रादेशिक पक्षांशी ताळमेळः अनेक राज्यांमध्ये काँग्रेसला तिथल्या स्थानिक प्रादेशिक पक्षांशी जुळवून घ्यावे लागत आहे, ज्यामुळे पक्षांतर्गत मतभेद आणि जागावाटपाचे पेच निर्माण होत आहेत.

आगामी निवडणुकांची कसोटीः २०२६ मधील विधानसभा निवडणुकांमध्ये (पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू इ.) भाजप आपले पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे. या राज्यांमध्ये काँग्रेसला स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. थोडक्यात सांगायचे तर, काँग्रेस आता केवळ एक कमकुवत विरोधी पक्ष राहिलेली नाही; ती सरकारला घेरण्याची आणि राष्ट्रीय अजेंडा प्रभावित करण्याची क्षमता दाखवत आहे. मात्र, संपूर्ण सरकारवर 'हावी' होण्याइतकी राजकीय आणि संख्याबळाची ताकद अजूनही काँग्रेसकडे नाही, कारण सत्तेची प्रमुख सूत्रे आणि बहुतांश राज्यांची सत्ता अजूनही एनडीएच्याच हातात आहे.

- ९५६१५९४३०६

# कांगारूंनी बांगला टायगर्सला चिरडले तर भारताने लंकेला ठोकले

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

ऑस्ट्रेलियाचा डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने त्याचा संघसहकारी आणि कर्णधार पॅट कमिन्स आणि फिरकी गोलंदाज नॅथन लायन यांना मागे टाकत आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या (डब्ल्यूटीसी) इतिहासातील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनण्याचा मान मिळवला आहे. मॅके येथे बांगलादेशविरुद्धच्या आपल्या संघाच्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान स्टार्कने ही कामगिरी केली. डार्विनमधील निराशाजनक पराभवानंतर (मायदेशात बांगलादेशविरुद्ध ऑस्ट्रेलियाचा हा पहिलाच पराभव होता), स्टार्कने जोरदार पुनरागमन करत एकूण १० बळी घेतले. त्याने पहिल्या डावात ६/१२ आणि दुसऱ्या डावात ४/३९ अशी कामगिरी नोंदवली.

स्टार्क आता डब्ल्यूटीसीमध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. त्याच्या नावावर २४.२५ च्या सरासरीने २३४ बळी आहेत, ज्यात ११ वेळा चार बळी आणि आठ वेळा पाच बळी घेण्याच्या कामगिरीचा समावेश आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी ७/५८ ही आहे. त्याने प्रत्येकी २२८ बळी घेणाऱ्या कमिन्स आणि लायन यांना मागे टाकले आहे. डब्ल्यूटीसीच्या इतिहासात २०० किंवा त्याहून अधिक बळी घेणारे हे तीन ऑस्ट्रेलियन गोलंदाज एकमेव आहेत. स्टार्कने दोन सामन्यांत १२ बळी घेत मालिकावीर पुरस्कार पटकावला. तो २०२५-२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) चक्रातील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाजही आहे. त्याने १० सामन्यांत १६.९८ च्या सरासरीने ५८ बळी घेतले आहेत, ज्यात एकदा चार आणि चार वेळा पाच बळी घेण्याच्या कामगिरीचा समावेश आहे. या सामन्यादरम्यान, त्याने दक्षिण आफ्रिकेच्या डेल स्टेनला मागे टाकत आतापर्यंतच्या टॉप १० कसोटी बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत प्रवेश केला; त्याच्या नावावर आता ४४५ कसोटी बळी आहेत.

बांगलादेशविरुद्ध मायदेशात ऑस्ट्रेलियाचा पहिला पराभव हा त्यांच्या खराब अष्टपैलू कामगिरीमुळे झाला होता. त्यानंतर, गोलंदाजांच्या गटाने, विशेषतः स्टार्कने, जोरदार पुनरागमन केले आणि ऑस्ट्रेलियाची ताकद दाखवून दिली. त्यांनी बांगलादेशला दोन्ही डावांमध्ये १०० धावांचा टप्पा ओलांडू दिला नाही आणि एक डाव व ५१ धावांनी सामना जिंकला. मात्र, ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीत उणिवा कायम आहेत आणि ऑक्टोबरमध्ये दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या कसोटी मालिकेपूर्वी संघ त्या दूर करण्याचा प्रयत्न करेल.

तसेच त्यांचा दुसरा प्रमुख खेळाडू व फिरकी गोलंदाज नॅथन लायन हा ६०० आंतरराष्ट्रीय बळी घेणारा पाचवा ऑस्ट्रेलियन गोलंदाज आणि शेन वॉर्ननंतरचा दुसरा ऑस्ट्रेलियन फिरकी गोलंदाज ठरला आहे. लायनने रविवारी मॅके येथे बांगलादेशविरुद्ध हा टप्पा गाठला. पहिल्या डावात संधी न मिळाल्यानंतर, लायनने दुसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात ११.३ षटकांत ३/२५ अशी कामगिरी केली.

लायनने १७४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३१.०० च्या सरासरीने ६०१ बळी घेतले आहेत, ज्यात २४ वेळा पाच आणि पाच वेळा दहा बळी घेण्याच्या कामगिरीचा समावेश आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी ८/५० ही आहे. त्याच्या पाठोपाठ शेन वॉर्न (३३८ सामन्यांमध्ये ९९९ बळी), वेगवान गोलंदाज ग्लेन मॅकग्रा (३७५ सामन्यांमध्ये ९४८ बळी), डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क (३०२ सामन्यांमध्ये ७७१ बळी) आणि वेगवान गोलंदाजीतील दिग्गज ब्रेट ली (३२२ सामन्यांमध्ये ७१८ बळी) यांचा क्रमांक लागतो.

लिऑनने आपले बहुतांश बळी कसोटी सामन्यांमध्ये घेतले असून, त्याने १४३ कसोटी सामन्यांमध्ये ३०.२० च्या सरासरीने ५७१ बळी घेतले आहेत. त्याच्या नावावर २४ वेळा ५ बळी आणि पाच वेळा १० बळी घेण्याची कामगिरी असून, ८/५० ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. तो वॉर्नच्या (१४५ सामन्यांमध्ये ७०८ बळी) नंतर, ऑस्ट्रेलियाचा कसोटीतील दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे.

लिऑनने ऑस्ट्रेलियासाठी २९ एकदिवसीय सामनेही खेळले असून, ४६.०० च्या सरासरीने २९ बळी घेतले आहेत, ज्यात ४/४४ ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. त्याने ऑस्ट्रेलियासाठी टी-२० क्रिकेटमध्ये दोन सामने खेळले असून, एका टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात एक बळी घेतला आहे.

भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलने रविवारी, येथील सिंहलीज स्पोर्ट्स क्लबवर श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी, कसोटी क्रिकेटमध्ये ३,००० धावा पूर्ण केल्या. गिलने या प्रकारात आपली सातत्यपूर्ण प्रगती सुरू ठेवत, हा पराक्रम करणारा चौथा सर्वात तरुण भारतीय खेळाडू बनण्याचा मान मिळवला आहे.

दुसऱ्या कसोटीत उतरण्यापूर्वी, हा टप्पा गाठण्यासाठी गिलला केवळ सात धावांची गरज होती; यापूर्वी गॉल येथे झालेल्या मालिकेतील पहिल्या कसोटीत त्याने हा टप्पा गाठण्याची संधी गमावली होती. कर्णधाराने २३



व्या षटकात केसरा नुवान्थाच्या गोलंदाजीवर बॅटची बाहेरील कड लागून आपल्या ३,००० धावा पूर्ण केल्या. वयाच्या २६ वर्षे आणि ३४९ दिवसांत, गिल हा पराक्रम करणारा चौथा सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला आहे. या यादीत महान माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर (२३ वर्षे २२८ दिवस) अग्रस्थानी असून, वीरेंद्र सेहवाग (२६ वर्षे १५७ दिवस) आणि दिलीप वेंगसरकर (२६ वर्षे २६३ दिवस) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

गिलने या यादीत महान खेळाडू आणि माजी कर्णधार कपिल देव यांना मागे टाकले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्वात लांब फॉरमॅटमध्ये ३,००० धावा पूर्ण केल्या तेव्हा कपिल देव २६ वर्षे आणि ३५६ दिवसांचे होते. गिलने सावधपणे फलंदाजी केली आणि डावखुरा फिरकी गोलंदाज प्रभात जयसूर्याच्या गोलंदाजीवर १३ व्या चेंडूवर फटका मारून आपले खाते उघडले. त्यानंतर लगेचच आणखी एक चौकार मारून त्याने आपला टप्पा गाठला.

**भारतासाठी ३,००० कसोटी धावा करणारे सर्वात तरुण खेळाडू**

२३ वर्षे २२८ दिवस - सचिन तेंडुलकर
२६ वर्षे १५७ दिवस - वीरेंद्र सेहवाग
२६ वर्षे २६३ दिवस - दिलीप वेंगसरकर
२६ वर्षे ३४९ दिवस - शुभमन गिल
२६ वर्षे ३५६ दिवस - कपिल देव

पाहुण्या संघाने यशस्वी जयस्वालची विकेट गमावल्यानंतर भारतीय कर्णधार फलंदाजीसाठी आला. जयस्वाल ४५ धावांवर असिथा फर्नांडोच्या गोलंदाजीवर बाद झाला, ज्याने सलामीवीराला बाद केले आणि त्यामुळे जोरदार शाब्दिक चकमक झाली. तत्पूर्वी, खेळाच्या पहिल्या तासातच केएल राहुल बाद झाला होता; लाहिरू कुमाराच्या गोलंदाजीवर कट शॉट मारण्याचा प्रयत्न करताना तो यष्टीरक्षकाच्या हाती झेलबाद झाला. २५ षटकांनंतर जेवणाच्या वेळी पाहुण्या संघाची धावसंख्या ८८/२ होती.

कोलंबो येथे श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत यशस्वी जयस्वालची आश्वासक सुरुवात, भारतीय सलामीवीर ४५ धावांवर बाद झाल्यावर आसिथा फर्नांडोसोबत झालेल्या जोरदार शाब्दिक चकमकीने संपुष्टात आली. ही घटना पहिल्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात भारताच्या पहिल्या डावातील १७ व्या षटकात घडली. आपल्या ५३ चेंडूंच्या खेळीत जयस्वाल चांगल्या लयीत दिसत होता. त्याने नऊ चौकार मारले आणि जेव्हा जेव्हा श्रीलंकेच्या गोलंदाजांनी टप्पा किंवा दिशा चुकवली, तेव्हा त्यांच्यावर दबाव आणला. त्या षटकात आधीच तीन चौकार खाल्लेल्या फर्नांडोला अखेर शेवटच्या चेंडूवर यश (जयस्वालची विकेट) मिळाले. अराउंड द विकेट गोलंदाजी करताना, फर्नांडोने आत येणारा चांगल्या लांबीचा चेंडू टाकला. डावखुऱ्या फलंदाजाने तो ऑफ साइडला खेळण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटच्या आतल्या कडेला लागून यष्टींवर आदळला आणि त्याचा डाव संपला. त्यानंतर फर्नांडो खूपच चिडला आणि त्याने आक्रमकपणे जयस्वालला तंबूत पाठवले. भारतीय फलंदाज मैदानाबाहेर जात असताना, त्याला गोलंदाजाकडून काहीतरी ऐकू आले आणि तो मागे वळला, ज्यामुळे त्या दोघांमध्ये वाद सुरू झाला.

जेव्हा जयस्वाल आणि फर्नांडो समोरासमोर आले, तेव्हा परिस्थिती आणखी चिघळली. त्यांची डोकी एकमेकांवर आदळली आणि त्यांनी एकमेकांना ढकललेसुद्धा. मात्र, श्रीलंकेच्या खेळाडूंनी तात्काळ हस्तक्षेप करून त्यांना वेगळे केले, त्यामुळे हा वाद मिटला आणि खेळ पुन्हा सुरू होऊ शकला.

सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताने ५ बाद ३०० धावा केल्या त्यामध्ये देवदत्त पडिक्कलची सलग दुसऱ्या सामन्यातील खेळी मुख्य आकर्षण होती. कर्णधार गिल ५०, जयस्वाल ४५, जडेजा ४३, केएल राहुल १८, यांनीही आपले योगदान दिले. मात्र तिघेही चांगल्या खेळीचे मोठ्या खेळीत रुपांतर करू नाही. जर झाले असते तर भारताची स्थिती आणखी सहढ दिसली असती. सामन्याच्या दुसऱ्या जखमी रिषभ पंतने ६३ धावांची झुंजर खेळी खेळून भारताची डुबती नौका सावरली. सारांश जैन फारसे काही करू शकला नाही. मानव सुथारने १८ केल्या. ध्रुव जुरेलची शानदार खेळी भारताची परिस्थिती सद्ढ करण्यास हातभार लावून गेली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# कर वसुलीसाठी संपत्ती जप्तीची कारवाई करा !

## मनपा आयुक्त डॉ. विपीन यांचे कर संग्रहकांना निर्देश, ३० दिवसात १ हजार कोटी वसुलीचे आयुक्तांचे लक्ष्य

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहराच्या विकासासाठी मालमत्ता कराची वसुली आवश्यक असून थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी कर संग्रहकांनी मालमत्ताधारकांवर चल-अचल संपत्ती जप्तीची कारवाई करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.



थकीत मालमत्ता कर वसुली करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत मालमत्ता कर वसुली अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. २३) नियोजन भवनात कर संग्रहकांची कार्यशाळा पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सदाशिव शेळके, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त गणेश राठोड, उपायुक्त अशोक गराटे, सहाय्यक आयुक्त अनिकेत धोपड, राजकुमार मेश्राम, हरीश राऊत, प्रमोद वानखेडे, विकास रायबोले, धनंजय जाधव यांच्यासह सर्व झोनचे कर संग्रहक व सुपरवायझर उपस्थित होते.

महापौर निता ठाकरे यांच्या निर्देशानुसार व आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात व मोहिमेला सुरूवात झाली आहे. या मोहिमेचे नेतृत्व मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम. आणि मिलिंद मेश्राम करीत आहे. स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर तथा कर संकलन विशेष समिती सभापती सरिता कावरे यांनीही नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे.

शहरातील एकूण मालमत्ता कराची थकबाकी २२५० कोटी रुपये असून या मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपयांची वसुली व्हावी, असे आयुक्तांनी यावेळी सांगितले. यासाठी सर्व कर संग्रहकांनी सर्वाधिक थकीत कर असलेल्यांची यादी करावी व त्यांच्याकडून वसुलीसाठी तगादा लावावा. थकीत रक्कम न भरणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. यात पिण्याच्या पाण्याचे नळाचे कनेक्शन कापण्याचे अधिकार देण्यात आले. याशिवाय व्यावसायिक मालमत्ता असल्यास तेथील चल संपत्ती जप्तीची कारवाई करावी. त्या कारवाईचे फोटो व व्हीडीओ काढून प्रसिद्धीस द्यावे, यामुळे दुसऱ्या थकबाकीदारांवर वचक निर्माण होईल.

### आवश्यकता असल्यास पोलीस पथक

ही कारवाई करताना कोणत्याही दबावाला कर संग्रहकांनी बळी पडू नये. काही संवेदनशील ठिकाणी कर संग्रहकांनी एनडीएसचे पथक किंवा पोलीस पथक घेऊन जावे. यासंदर्भात तशी मागणी केल्यास पोलीस पथक पुरविण्यात येईल, असेही आयुक्त डॉ. विपीन यांनी सांगितले.

### उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार

कर वसुलीचे उत्कृष्ट काम करणाऱ्या कर संग्रहकांना पुरस्कार दिला जाईल, अशी घोषणा आयुक्त डॉ. विपीन यांनी यावेळी केली.

### गैरहजर कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई

कर वसुलीमध्ये सहभाग न होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले. कर संग्रहकांना कर वसुलीचे मुख्य काम असताना कामात हलगर्जीपणा करणाऱ्या किंवा कामावर न येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम यांनी पीपीटीच्या सहाय्याने या अभियानाची माहिती दिली. तसेच कर संग्रहकांनी जप्तीची किंवा नोटीस बजाविण्याची कारवाई कशी करावी, याबद्दल कर संग्रहकांना मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी प्रत्येक कर संग्रहकांनी सर्वाधिक थकबाकीदारांची यादी तयार करावी. न्यायालयात दावे असलेल्या मालमत्ता सोडून इतर व्यावसायिक मालमत्ताची थकीत रक्कम वसुलीला कर संग्रहकांनी प्राधान्य द्यावे, अशी सूचना मेश्राम यांनी केली. याशिवाय मालमत्ता कर विभागाच्या आस्थापनेवर असणारे परंतु, कामास्तव इतर विभागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना संबधित विभाग प्रमुखांनी कार्यमुक्त करावे अन्यथा संबंधित विभाग प्रमुखांवर देखील कार्यवाही केली जाणार असल्याचे निर्देशित केले आहे.

थोडक्यात

## उद्या नागपूरात ओबीसीं महासंघाची बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



भारत सरकारने राजपत्राच्या प्रश्नावली मध्ये ओबीसी साठी स्वतंत्र्य कॉलम ची सूची नसल्याने,२०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या ठिय्या आंदोलनाच्या नियोजन व ओबीसींच्या प्रलंबित मागण्या संदर्भात २६ ऑगस्ट २०२६ ला धनवटे नॅशनल कॉलेज, काँग्रेस नगर, नागपुर येथे दुपारी १२ बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीत २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावी या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान होणाया ठिय्या आंदोलनाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

सदरची बैठक राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या सर्व विंगचे सर्व पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष व सभासदांनी आणि ओबीसी संघटना, सर्व जात संघटनानी महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय ओबीस महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी केले आहे.

## आशा कार्यकर्त्यांसाठी आयोजित दिव्यांग संवेदनशीलता कार्यशाळा संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

'आम्ही आमच्या आरोग्यासाठी', कुरखेडा यांच्या समुदाय आधारित दिव्यांग व्यक्ती पुनर्वसन प्रकल्पांतर्गत जवळी प्राथमिक आरोग्य केंद्रात आशा कार्यकर्त्यांसाठी दिव्यांग व्यक्तींबाबत जाणीव-जागृती व संवेदनशीलता कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा समन्वयक प्रितम नानवटे यांनी दिव्यांग व्यक्तींची गावपातळीवर ओळख, त्यांच्या अडचणी समजून घेणे तसेच दिव्यांग प्रमाणपत्र, UDID कार्ड आणि शासकीय योजनांशी त्यांना जोडण्याबाबत मार्गदर्शन केले. तालुका आरोग्य सहाय्यक अशोक हेडाऊ, डॉ. ऋतुजा ठोकळ, आरोग्य सहाय्यक केशव चंदनखेडे, सोमकुवर, आशा फॅसिलेटर विशाखा भोयर व विद्या धुर्वे यांच्यासह इतरांनीही मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे संचालन धम्ममाला टेटु यांनी केले, तर छाया तलमले यांनी आभार मानले. प्रत्येक पात्र दिव्यांग व्यक्तीला आवश्यक प्रमाणपत्र व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गावागावात काम करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

## ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर पोलिसांची मुस्लिम कमिटीसोबत बैठक

### जुलूसचा मार्ग, सहभागींची संख्या व सुरक्षा व्यवस्थेबाबत चर्चा, शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

आगामी २६ ऑगस्ट २०२६ रोजी साजरा होणाऱ्या ईद-ए-मिलाद-उन्नबी सणाच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर पोलिसांकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक नियोजन सुरू करण्यात आले आहे. याच अनुषंगाने २२ ऑगस्ट रोजी बल्लारपूर व विसापूर येथील मुस्लिम कमिटीच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक घेण्यात आली. बल्लारपूर पोलीस ठाण्यात आयोजित या बैठकीस जामा मस्जिद कमिटी बल्लारपूरचे अध्यक्ष उस्मान गुलजार शेख, नगर सेवक इस्माईल ढाकवाला यांच्यासह शहरातील विविध मस्जिद कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी ईद-ए-मिलादच्या निमित्ताने काढण्यात येणाऱ्या जुलूसच्या मार्गाबाबत, जुलूसमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांच्या संभाव्य संख्येबाबत तसेच आवश्यक सुरक्षा व्यवस्थेबाबत पोलिसांनी कमिटीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. सणाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येण्याची शक्यता लक्षात घेता वाहतूक व्यवस्था, जुलूसचा मार्ग, गर्दीचे नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत आवश्यक सूचना उपस्थितांना देण्यात आल्या. कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच सण उत्साहात आणि शांततेत पार पडावा, यासाठी सर्वांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच सणाच्या कालावधीत कोणतीही अफवा पसरवू नये, संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशा विविध सुरक्षाविषयक सूचना देण्यात आल्या.

ईद-ए-मिलादचा सण शांततेत, सुरक्षित वातावरणात आणि उत्साहात पार पडावा यासाठी बल्लारपूर पोलीस प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून, नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्याकडून करण्यात आले आहे.

## अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात मनपाची नोटीस कार्यवाही

### महापौरांच्या निर्देशांची अंमलबजावणी करीत मे. आकाश इंस्टिट्यूटला नोटीस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महापौर निता ठाकरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात नागपूर महानगरपालिकेने धडक कार्यवाही करीत सोमवारी (ता. २४)विविध आस्थापनांना नोटीस दिले. विशेष म्हणजे, धरमपेठ झोन अंतर्गत परिसरातील दोन आस्थापनांवर तसेच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमाननगर झोन मध्ये चार आस्थापनावर नोटीस बजाविण्यात आले. महापौरांच्या निर्देशानुसार मनपाच्या संबंधित विभाग व झोन कार्यालयांमार्फत शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमणांची व अनधिकृत बांधकामांची पाहणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन आढळलेल्या संबंधितांना नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामध्ये खासगी शिक्षण संस्था, वाईन शॉप, रेस्टोरेंट या आस्थापना तसेच इतर स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमाननगर झोनः वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमाननगर झोन अंतर्गत परिसरांतील अवैध बांधकाम व अतिक्रमणाची पाहणी करण्यात आली. त्यानुसार येथील अतिक्रमण करणाऱ्या चार आस्थापनांना संबंधित कार्यवाही करून नोटीस देण्यात आले आहे. यात मे. नैवेद्यं प्युर व्हेज फॅमिली रेस्टोरेंट, मे. शान किचन अँड बार, श्री. निखिल नरेश कुसुमगर, मे. डोर्लीकर वाईन शॉप या आस्थापनांचा समावेश आहे.

## काँग्रेसच्या विरोधामुळे मौदा न.पं.मध्ये विकासाला खिळ, नगराध्यक्ष तिडके यांचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनीही राजकीय मतभेद बाजूला ठेवून सकारात्मक आणि विकासभिमुख भूमिका बजावली पाहिजे. असे असूनही मौदा नगरपंचायत मध्ये विरोधी पक्ष जनतेने निवडून दिलेल्या बहुमताचा अनादर करत आहे आणि शहराच्या विकासात अडथळा आणत आहे. असा आरोप मौदा नगरपंचायत अध्यक्ष प्रसन्ना उर्फ ??राजाभाऊ तिडके यांनी पत्रकार परिषद मध्ये केला. देशात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजप सत्तेत आहे. मौद्यातील रहिवाशांनी भाजप नेते प्रसन्ना तिडके यांना अध्यक्षपदी निवडून दिले.



मौदा-कामठी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे देखील मौदाच्या विकासासाठी उत्सुक आहेत. परंतु नगरपंचायतीमध्ये काँग्रेस पक्षाचे बहुमत असल्यामुळे, काँग्रेसचे नगरसेवक विकासकामांना अडथळा आणत आहेत आणि विरोध करत आहेत. २१ ऑगस्ट रोजी झालेल्या मौदा नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेच्या कार्यसूचीत एकूण ५७ विषय होते. यामध्ये दाट लोकवस्तीच्या भागातून मटण बाजाराचे स्थलांतर, कन्हान नदीच्या काठावरील पदपथाचे सुशोभीकरण, पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम, मौदा टी-पॉइंट आणि केसलापूर टी-पॉइंट प्रवेशद्वारांचे बांधकाम, स्मशानभूमीचे सुशोभीकरण, जयस्तंभ चौक ते टाका परिसर पर्यंतच्या नाल्याची आणि रस्त्याची दुरुस्ती, बाजार चौक ते केसलापूर पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती आणि एनटीपीसी सोलर लाईटची व्यवस्था यांचा समावेश होता.

नगराध्यक्ष तिडके यांनी काँग्रेसच्या नगरसेवकांवर वीज योजनेला परवानगी, सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम, विविध प्रभागांतील मोकळ्या जागांचे सुशोभीकरण यांसारख्या अनेक प्रस्तावांना विरोध केल्याचा आणि बहुमताच्या जोरावर सर्व प्रस्ताव फेटाळल्याचा आरोपही केला. त्यांनी उपाध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांना राजकीय मतभेद विसरून मौदाच्या विकासासाठी पत्र परिषदेच्या माध्यमातून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही केले. या पत्र परिषदेत माजी नगराध्यक्ष उमेश गभणे, भाजपचे नगरसेवक मोरेश्वर सोरते, रमेश कुंभलकर, राहुल पोटभरे, दीपिका पोटभरे, माजी उपाध्यक्ष मुन्ना चलसानी इत्यादी उपस्थित होते.

## बल्लारपुरात जिल्हास्तरीय आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### १८५ खेळाडूंचा सहभाग, विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव




**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

रोटरी क्लब ऑफ बल्लारपूर आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुल, विसापूर येथे आयोजित सहाव्या जिल्हास्तरीय आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेचा दोन दिवसीय सोहळा उत्साहात पार पडला. २२ व २३ ऑगस्ट रोजी झालेल्या या स्पर्धेत बल्लारपूर, चंद्रपूर, राजुरा आणि गडचिरोली येथील विविध शाळांमधील तब्बल १८५ खेळाडूंनी सहभाग घेत आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना नगराध्यक्ष अल्का वाढई, चंद्रपूर मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ. अनिल वाढई तसेच माजी नगराध्यक्ष व भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विजेत्या तसेच सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल क्रीडा भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी प्रोजेक्ट डायरेक्टर मनीष मूलचंदानी आणि अनूप गंगशेट्टीवार यांनी सांभाळली. स्पर्धेच्या आयोजनासाठी रोटरी व रोटरॅक्ट क्लबच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी खेळाडूंशी संवाद साधताना क्रीडा क्षेत्रातील सहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि जिद्द विकसित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. शुभांगी शर्मा, रोटरी क्लबचे अध्यक्ष राजू मुंदडा, सचिव निखिल गुजरकर, प्रशांत दोंतुलवार, अमोल वर्मा, निलेश चिमड्यालवार यांच्यासह खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बल्लारपूर परिसरातील युवा खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या अशा स्पर्धांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## रसायनशास्त्र विभाग,नबीरा महाविद्यालय,काटोलकडून मेहंदी चॅलेंज व केम वॉक : या दोन अभिनव स्पर्धेचा अविष्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नबिरा महाविद्यालय, काटोल येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये रसायनशास्त्र विषयाबद्दलची आवड, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने दि. २१ व २२ ऑगस्ट २०२६ रोजी मेहंदी चॅलेंज व केम वॉक : या अभिनव स्पर्धेचे राष्ट्रीय रसायनशास्त्र दिनानिमित्त आयोजन करण्यात आले होते.



मेहंदी चॅलेंज या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मेहंदीच्या माध्यमातून रसायनशास्त्रातील विविध संकल्पना, रासायनिक चिन्हे, अणुरचना, रेणूंच्या आकृत्या तसेच रसायनशास्त्राशी संबंधित कलात्मक कल्पना हातांवर साकारल्या. या उपक्रमामुळे विज्ञान आणि कलेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

तसेच केम वॉक : या उपक्रमात विद्यार्थ्यांनी रसायनशास्त्रातील विविध संकल्पना व वैज्ञानिक घटकांवर आधारित आकर्षक वेशभूषा सादर करून रसायनशास्त्राला कलात्मक आणि नाविन्यपूर्ण स्वरूप दिले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त या दोन्ही उपक्रमात सहभाग नोंदवत आपल्या सादरीकरणातून विज्ञानातील संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. विजयी सहभागींना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आले व सहभागींना प्रमाणपत्र व आकर्षक गिफ्ट देण्यात आले. या दोन्ही स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून डॉ. दमयंती घागरगुंडे व श्रीमती पाटील यांनी काम बघितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. सुनिल कुमार नवीन, विभागप्रमुख डॉ. निलेश गंधारे, तसेच प्रा. निलेश जाधव, प्रा. कैलास मोरे, डॉ. मनीष येवले, प्रा. दिशा बांद्रे, प्रा. आकांक्षा पवार, प्रा. कल्याणी कुडुपले, डॉ. शिवानी ठाकूर, प्रा. अलका पुरी आणि प्रा. पुष्पराज भुयार यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या आयोजनात महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी सुदेश रामावत, शैलेश मेंढे आणि लोचन राऊत यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. तसेच केमिस्ट्री क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि बी.एस्सी. व एम.एस्सी. रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्स्फूर्त सहभाग व परिश्रम घेतले. या अभिनव उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता सर्जनशीलता, कला, विज्ञान आणि नावीन्य यांचा संगम म्हणून पाहण्याची संधी मिळाली. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## शंकर नारायण शेंडे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



कचरा डम्पिंग चांदमारी पूर्व नागपूर प्लांट नं. १७६ रहिवासी, शंकर नारायण शेंडे यांचे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 35 वषार्चे होते. वाठोडा घाटावरील दुपारी २ वाजता. अंतिम संस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.

थोडक्यात

## उमरेडमध्ये तैलिक महासभेतर्फे श्रावण महोत्सव उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, नागपूर विभागाच्या वतीने विभागीय अध्यक्ष जगदीशजी वैद्य यांच्या नेतृत्वाखाली श्रावण महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्राच्या सणोत्सवाची नृत्यमयी उधळण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पंडित दीनदयाल उपाध्याय सभागृह, उमरेड येथे २३ ऑगस्ट रोजी झालेल्या या कार्यक्रमात समाजातील सर्व जाती, धर्म व पंथातील विवाहित महिलांसाठी सामूहिक व एकल नृत्य स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन उमरेड विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम यांच्या हस्ते झाले. माजी नगराध्यक्ष गंगाधरजी रेवतकर सहउद्घाटक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उडान फाउंडेशन, तुमसरच्या संस्थापक अध्यक्षा कल्याणी भुरे होत्या.

यावेळी माजी आमदार राजूभाऊ पारवे, कृष्णाई ज्वेलर्सच्या संचालिका प्रफुल्लाताई गिरडकर, एस.एस. डेव्हलपर अँड रिअल इस्टेटचे संजय तळेकर, उद्योजक आघाडीचे रोशन मेंढूले, सुषमाताई लाखे, हरिश्चंद्र दहाघाने, मीनाताई दहाघाने, नगरसेविका जयाताई गिरडकर, नगरसेविका जयश्री दिघोरे, संजय घुघुसकर, भरत भूषण अरोरा, राकेश नौकरकर, हुसेंद्र गिरडकर, गणेश वासुरकर, भाविका चाचरकर, अंजली चंदेल, नंदिनी वासुरकर, वैशाली बांदरे, गीता आगासे, सोनाली चंदनखेडे, सोनल बालपांडे, प्रवीण गिरडे, रोशन झोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महिलांसाठी आयोजित हा उपक्रम स्तुत्य असून महिलांनी उद्योजकतेच्या क्षेत्राकडे वळावे तसेच आपल्या पाल्यांना सक्षमपणे घडवावे, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. स्पर्धेत ८ समूह नृत्य आणि ११ एकल नृत्य सहभागी झाले. समूह नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे ७ हजार रुपयांचे पारितोषिक सखी सहेली ग्रुपने, द्वितीय क्रमांकाचे ५ हजार रुपयांचे पारितोषिक नटराज डान्स ग्रुपने, तृतीय क्रमांकाचे ३ हजार रुपयांचे पारितोषिक ग्रीन गार्डन ग्रुपने, चौथ्या क्रमांकाचे २ हजार रुपयांचे पारितोषिक गायत्री योगा ग्रुपने, तर पाचव्या क्रमांकाचे १ हजार रुपयांचे पारितोषिक सिद्धी विनायक डान्स ग्रुपने पटकावले. एकल नृत्य स्पर्धेत मोनाली धनजोडे यांनी प्रथम, यशोदाताई वाघमारे यांनी द्वितीय, शितल येनसकर यांनी तृतीय, तर वैशाली डहाके यांनी चौथा क्रमांक पटकावला. संगीता मिश्रा यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले.

लकी ड्रॉच्या माध्यमातून १० पैठणी साड्यांचे वितरण भारत भूषण अरोरा यांच्या वतीने करण्यात आले. तसेच प्रफुल्लाताई गिरडकर यांनी सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देऊन गौरविले. कार्यक्रमाचे संचालन प्रवीण गिरडे व सोनल बालपांडे यांनी केले, तर हरिश्चंद्र माधवराव दहाघाने यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शालू झाडे, संध्या वैद्य, माधुरी पडोळे, राजश्री भुसारी, मनिषा मुंगले, वर्षा गिरडे, सुरेखा गोल्हर, रेखा मुळे, अर्चना बेले, मनीषा येवले, चैताली वंजारी, रेखा भूसारी, हर्षा वाघमारे, वर्षा वंजारी, जानवी ढोके, किरण कांबळे, मंगला भुसारी, रेखा बेले, रोशनी वाघमारे, सुनिता भुते, अनिता वाघमारे, दर्शना ढोके, रिता देवके, साक्षी लोहकरे, राजहंस देशमुख, प्रभाकरजी बेले, भूमीपाल पडोळे, तातेराव तीमांडे, प्रकाश वाघमारे, ओमप्रकाश आगासे, लेमन बालपांडे, हरिश्चंद्र झाडे, अंबादास मेंघरे, श्रीराम वाघे, पवन जोधे, भगवान बेले, हरिश्चंद्र गवळी आदींनी सहकार्य केले.

## आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या दणका, पोलीस प्रशासनाने घेतली दखल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मनपाने कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचा कार्यालयावर सील लावून हिटलरशाहीचा परिचय दिला. या घटनेचा निषेधार्थ आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाने मनपाचा मस्तवाल अधिकारी यांच्या विरोधात संविधान चौक येथे आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांच्या नेतृत्वाखालील तीव्र आंदोलन करण्यात आले. जेव्हा पर्यत मागणी पूर्ण होणार नाही तेव्हा पर्यत आंदोलन सुरूच राहील असा संकल्प करण्यात आला.

देवेंद्र बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मनमा आयुक्त यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. शिष्टमंडळात प्रवीण आवळे, प्रा.रमेश दुपारे, प्रकाश कांबळे, हंसराज उरकुडे,जयदेव चिवंडे, के.टी.कांबळे उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले की प्रकरण न्यायप्रविष्ट असून सुध्दा कारवाई अवैध प्रकारे करण्यात आली. कार्यालयात ऐतिहासिक आंबेडकरी साहित्य ठेवले आहेत ते खराब होणाचा धोका आहे, असलेली थकबाकी किस्तप्रमाणे करून देण्यात यावी,ईत्यादी मागण्याचा समावेश करण्यात आले आहेत. आंदोलनात राजु कांबळे, रोहित पांडे. पवण वर्मा. नरेश खना, तन्हा नागपूरी, मनोहर इंगोले, रमेश डकाह, रमेश पांडुरंग दुपारे, गुडू रंगारी, सुभाष हाडके, गौतम बागडे, प्रकाश ठोसर सह मोठया प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या २५७ प्रकरणांची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. रविवार ते शनिवार (ता.१६ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट) शोध पथकाने २५७ प्रकरणांची नोंद करून १,७५,९०० रुपयाचा दंड वसूल केला.सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी थुंकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून २०० रूपयाची वसुली करण्यात आली. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# मारबत महोत्सव आता जागतिक स्तरावर

## शिवानी दाणी-वखरे यांनी दिल्लीत जाऊन दिले निमंत्रण

### मान्यवरांच्या मनात महोत्सवाचा उत्साह निर्माण व्हावा यासाठी 'इडा पिडा घेऊन जा गे मारबत' असे बोधचिन्ह, मोमेंटो आणि भेटवस्तू असणारा विशेष निमंत्रण बॉक्स



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात पर्यटकांचा ओघ वाढविण्यासह शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी आणि नागपूरचा सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने भव्य 'मारबत महोत्सवाचे' आयोजन करण्यात येत आहे. यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली असून, यंदाच्या ऐतिहासिक मारबत महोत्सवाच्या निमंत्रणासाठी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी थेट दिल्ली येथे जाऊन राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांना आदरयुक्त निमंत्रण दिले.

स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी दिल्लीत मध्ये नागपूरच्या या ऐतिहासिक आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेला नव्या उंचीवर नेण्याच्या उद्देशाने महोत्सवाचे अधिकृत निमंत्रण दिले. यात गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, खासदार विनोद तावडे यांना शिवानी दाणी वखरे यांनी स्वतः महोत्सवासाठी निमंत्रित केले.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या देखरेखीत मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. त्यातच एक भाग म्हणून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांना महोत्सवासाठी निमंत्रित केले जात आहे.

**विशेष निमंत्रण बॉक्स**

मान्यवरांच्या मनात महोत्सवाचा उत्साह निर्माण व्हावा यासाठी 'इडा पिडा घेऊन जा गे मारबत' असे बोधचिन्ह, मोमेंटो आणि भेटवस्तू असणारा विशेष निमंत्रण बॉक्स शिवानी दाणी यांनी मान्यवरांना दिला. यावेळी शिवानी दाणी वखरे यांनी मारबत महोत्सवाला जागतिक स्तरावर पोहोचवण्यासह मनपाच्या विविध नियोजनांची माहिती दिली. यात नागरिकांच्या आकर्षणासाठी ७ दिवसीय विशेष 'सावजी आणि बुनकर महोत्सवाचे' आयोजन, शहरातील १०० चौकांमध्ये दफ कोडच्या माध्यमातून ऑडिओ-



व्हिज्युअल फिल्मची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे सांगत त्यांनी शहरात एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून देशभक्तीपर गीतांचे प्रसारण करणे, महोत्सवासाठी बाहेरून येणाऱ्या पर्यटकांसाठी शहरातील हॉटेल व निवासी व्यवस्थेचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष ग्रेडिंग व प्रमाणपत्र प्रणाली राबवली जाणार असल्याचे त्यांनी मान्यवरांना सांगितले.

नागपूरची ऐतिहासिक संस्कृती जपणाऱ्या आणि १४५ वर्षांचे ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या या मारबत महोत्सवासाठी मनपाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे. नागपूरच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि जागतिक स्तरावर प्रसार करण्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. महोत्सवात नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग राहावा आणि शहराचे वैभव जगासमोर यावे, यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त व्यक्तींना निमंत्रित केले जाणार आहे.

## मिहान इंडिया लिमिटेडकडून ५ कोटींचा थकीत मालमत्ता कर धनादेश सुपूर्द

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने धडक मोहिम सुरू करण्यात आली आहे. शहरातील १० झोनमधील थकीत मालमत्ता कराच्या वसुलीच्या मोहिमेला सुरूवात झाली असून, मोहिमेचे चांगले परिणाम बघायला मिळत आहे. सोमवारी (ता.२४) मिहान इंडिया लिमिटेडतर्फे सीएमडी डॉ. विपीन यांनी ५ कोटी रुपयांच्या थकीत रकमेचा




धनादेश मनपाला सुपूर्द केला. तसेच प्रत्येक झोन मध्ये थकीत मालमत्ता कर धारकांकडे मनपाचे कर संग्राहक जाऊन थकीत रकमेची वसुली करीत आहे. ही मोहीम येत्या ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

महापौर निता ठाकरे यांच्या निर्देशानुसार व आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात व मोहिमेला सुरूवात झाली आहे. या मोहिमेचे नेतृत्व मनपाचे अतिरिक्त आयुक्त गुरुगानंथम एम., आणि मिलिंद मेश्राम करीत असून, मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपये थकीत मालमत्ता कर वसूल करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. महापौर निता ठाकरे यांनी सोमवारी(ता.२४) थकीत मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेतला.

सर्व झोनमध्ये वसुलीची कार्यवाही अधिक गतिमान करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांनी मालमत्ता कर वसूली अभियानाचा आढावा घेताना थकीत कराची प्रभावी व तातडीने वसुली करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## राज्य सरकारने विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी 'केजी टू पीजी' मोफत शिक्षण योजना लागू करा : प्रदीप देशपांडे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी, प्रादेशिक अनुशेष दूर करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विदर्भ 'केजी टू पीजी' मोफत व दर्जेदार शिक्षण योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी शेतकरी, विदर्भ प्रादेशिक विकास व शैक्षणिक हक्क समितीचे संयोजक प्रदीप वसंत देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत केली. विदर्भ हा नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध प्रदेश असला, तरी गेल्या अनेक दशकांपासून या भागाला प्रादेशिक अनुशेष, कृषी संकट आणि शैक्षणिक मागासलेपणाचा सामना करावा लागत आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांतील मोठा वर्ग शेती व रोजंदारीवर अवलंबून आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय तसेच उच्च तंत्रशिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या कठीण होत असल्याचे देशपांडे यांनी सांगितले. उच्च शिक्षणाचा वाढता खर्च आणि ग्रामीण कुटुंबांची मर्यादित आर्थिक क्षमता यामुळे अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागते परिणामी शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक भार वाढतो. या पार्श्वभूमीवर शिक्षणाला शेतकरी सक्षमीकरण, प्रादेशिक विषमता निर्मूलन आणि मानव संसाधन विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहण्याची गरज असल्याचे देशपांडे यांनी स्पष्ट केले.

विदर्भातील सर्व घटकांतील -ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच खुल्या प्रवर्गातील–विद्यार्थ्यांनी बालवाडीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मोफत व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून द्यावे. तसेच अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणासाठीही विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी करण्यात आली. खएए आणि ठएएळ सारख्या स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी कोचिंग शुल्क, तसेच गरजू विद्यार्थ्यांच्या वसतिगृह व भोजनाचा खर्च शासनाने उचलावा. विदभार्तील ग्रामीण शाळांचे डिजिटल आधुनिकीकरण करून त्यांना स्मार्ट शाळांमध्ये रूपांतरित करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी समितीने केली आहे. या योजनेसाठी राज्य शासनाने आगामी अर्थसंकल्पात सुमारे ८,५०० कोटी ते १०,७०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही पत्रकार परिषदेत करण्यात आली. 'मोफत शिक्षणासोबत गुणवत्तेचीही हमी हवी' केवळ शिक्षण मोफत करून उपयोग नाही, तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केजी टू पीजी योजनेत गुणवत्तेचे स्पष्ट निकष निश्चित करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे देशपांडे यांनी सांगितले. महाराष्ट्रात यापूर्वी विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजना अस्तित्वात असताना स्वतंत्र केजी टू पीजी योजनेची गरज का आहे, या प्रश्नाचे उत्तर देताना देशपांडे यांनी सांगितले की, सध्याच्या योजनांचा लाभ सर्व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत समान पद्धतीने पोहोचत नाही. त्यामुळे विदर्भातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे असे प्रदीप वसंत देशपांडे यांनी केले.

## वाडीतील 'विकृतां'चा बंदोबस्त करा, पोलिसी वचक दाखवा!

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

महिलांची-मुलींची छेडछाड आणि रात्री घरफोड्यांच्या घटनांनी वाडीतील दत्तवाडी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल महिनाभरापासून कथितपणे धुमाकूळ घालणाऱ्या विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर श्री संताजी अखिल तेली समाज संघटन, शाखेचे अध्यक्ष ए. एन. डहागने यांच्या नेतृत्वात वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन मगर यांना निवेदन देऊन तातडीने कडक कारवाईची मागणी केली आहे.

दत्तवाडी परिसरातील इंद्रायणी नगर आणि श्रीकृष्ण नगर येथे महिलांची व मुलींची छेडछाड



होत असल्याच्या तसेच रात्रीच्या घरफोड्यांच्या तक्रारी समोर येत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे नागरिकांनी आता स्वतःच रात्री गस्त घालण्यास सुरुवात केली असून, 'पोलिसांचा धाक आहे की नागरिकांनाच आपली सुरक्षा स्वतः करायची?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

एकीकडे महाराष्ट्र पोलीस दलाकडे आधुनिक आणि सुसज्ज यंत्रणा असल्याचा दावा केला जात असताना, महिनाभरानंतरही संबंधित गुन्हेगार पोलिसांच्या हाती न लागल्याबद्दल नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाडी डिफेन्स-दत्तवाडी परिसरात महिला आणि मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून, जनतेचा आक्रोश दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

विशेष म्हणजे, हा परिसर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृहजिल्ह्यात येतो. त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरही पोलिसांनी तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### दत्तवाडी परिसरात महिलांची छेडछाड, रात्री घरफोड्यांच्या घटनांनी दहशत, संताजी तेली समाज संघटनेचा पोलिसांना इशारा

संघटनेने आपल्या निवेदनातून गुन्हेगारांवर कायदेशीर चौकटीत राहून अत्यंत कठोर कारवाई करावी, महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करावी आणि पोलिसांचा वचक पुन्हा निर्माण करावा, अशी मागणी केली आहे. दत्तवाडी परिसरातील नागरिकांच्या भावना आणि पीडित महिलांचा आक्रोश पोलिस प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी हे निवेदन देण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आता पोलिस प्रशासन या तक्रारीची कितपत गांभीयार्ने दखल घेते, संबंधित आरोपींचा शोध कधी लागतो आणि दत्तवाडीतील भीतीचे वातावरण कधी संपते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## रोहीत पारवेंची जि.प. कार्यालयात भेट, भिवापूरच्या राजकारणात चर्चेला उधाण



भेटीदरम्यान जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी महामुनी यांना पुष्पगुच्छ देताना रोहित पारवे

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भाजपचे तरुण नेते रोहीत पारवे यांनी नागपूर जिल्हा परिषद कार्यालयात जाऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची वाढदिवसानिमित्त भेट घेतल्याचे छायाचित्र सध्या भिवापूरच्या राजकीय वतुर्ळात चचेर्चा विषय ठरत आहे. ही केवळ सदिच्छा भेट की आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींची चाहूल, अशी चर्चा रंगू लागली आहे.

रोहीत पारवे यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याची कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. त्यामुळे केवळ या भेटीवरून त्यांच्या उमेदवारीचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र त्यांच्या राजकीय पार्श्वभूमीमुळे या भेटीकडे विशेष लक्ष वेधले गेले आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीची चाहूल? वडिलांच्या पावलावर मुलगा चालणार?

रोहीत पारवे यांचे वडील तथा उमरेडचे माजी आमदार सुधीर पारवे यांनी कारगाव जिल्हा परिषद सर्कलमधून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणात प्रवेश केला. त्यामुळे रोहीत पारवेही भिवापूर तालुक्यातून जिल्हा परिषद राजकारणात सक्रिय होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, रोहीत पारवे यांनी चारगाव (मुगलाई) येथे आपले मतदान स्थलांतरित केल्याची चर्चा असून, या माहितीची अधिकृत मतदार यादीतून स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. हे स्थलांतर निश्चित झाल्यास त्याकडे राजकीय संदर्भातून पाहिले जाऊ शकते.

सध्या मात्र कोणतीही अधिकृत घोषणा नसल्याने सर्व चर्चा राजकीय अंदाजांपुरतीच मर्यादित आहे. आगामी काळात रोहीत पारवे भिवापूरमध्ये संघटनात्मक सक्रियता वाढवितात का आणि जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांचे नाव पुढे येते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

## ढिवर समाजासाठी जागेची मागणी; नितीन गडकरींना निवेदन: वनिताताई नगरे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ढिवर समाज महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने समाज भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी यांना निवेदन देण्यात आले. ढिवर समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी समाज भवनाची आवश्यकता असून, समाजातील महिला व नागरिकांना विविध उपक्रम राबविण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समाज भवन महत्त्वपूर्ण ठरेल, असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. यावेळी वनिता नगरे यांनी नितीनजी गडकरी यांना निवेदन दिले. यावेळी रश्मि नान्हे, महानंदा शिवरकर, भारती नान्हे, पूजा नगरे, श्रुती कणेर्के, आणि मनोज नगरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

## महा इन डोअर जूनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये एस.के पोरवाल कॉलेज विजयी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जूनियर राज्य अजिंक्यपद इंडोअर क्रिकेट स्पर्धा महा इंडोअर क्रिकेट असोसिएशन विद्यमानाने सन ,२०२६-२७ जुनियर राज्य जिंक्यपद व निवड चाचणी इंदोर क्रिकेट स्पर्धा दिनांक १६ ते १७ ऑगस्ट रोजी जळगांव येथे संपन्न झाली. ही स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल जळगाव येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नागपूर जिल्यातील कामठी येथील एस के पोरवाल जूनियर कॉलेजचे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये विष्णू सर्वज्ञ दिवाकर, डॅनी राजेश हटवार, वेदांत विकास समशेर, सर्वज्ञ संतोष खुर्गे,ईशांत नित्यानंद गम धुले यांनी फायनल मध्ये ११० रन्सचे टारगेट टारगेट देऊन जळगाव टीमला हरवून आपला प्रथम विजेतेपद प्राप्त केले.

तसेच एस. के पोरवाल कॉलेजच्या मुलींची राष्ट्रीय स्तराकरिता इंडोअर क्रिकेट गेममध्ये निवड झाली. त्यामध्ये धारणा कुलदीप कुमार, ध्यान साक्षी जयप्रकाश, सहारे निहारिका, अजय शंभरकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व विचार विजेते खेळाडूंना कॉलेजच्या प्राध्यापिका डॉक्टर मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच पुढील राष्ट्रीय स्तराच्या स्पर्धेकरिता कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहाट तसेच कॉलेजचे उपप्राचार्य विश्वनाथ वंजारी सर व पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे तसेच कॉलेजचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## आदिवासी गोवारी (गोंड गोवारी) फाउंडेशन रामटेक तर्फे भारतीय सेनेमध्ये ट्रेनिंग पूर्ण करणाऱ्या तेजस राऊतचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आदिवासी गोवारी (गोंड गोवारी) फाउंडेशन चे वरिष्ठ सदस्य रामटेक तालुक्यातील मुसेवाडी येथील लक्ष्मण राऊत यांच्या मुलगा कु. तेजस लक्ष्मन राऊत याची भारतीय सेनेमध्ये ट्रेनिंग पुर्ण केल्याबद्दल नुकताच त्याचा भव्य स्वागत सत्कार समारंभ मूसेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व सर्व गावकरी समाज बांधवांचा उपस्थित पार पडले. आदिवासी गोवारी (गोंड गोवारी) फाउंडेशन तर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन तेजसचे स्वागत व सत्कार करून तेजसचा मनोबल वाढवण्यात आला.

याप्रसंगी आदिवासी गोवारी( गोंड गोवारी) फाउंडेशन रामटेक अध्यक्ष भास्कर राऊत, सचिव कृष्णा सहारे, कोषाध्यक्ष सतीश गाडे, सदस्यगण ब्रह्मानंद नेवारे, श्रावण पंचभाये, किशोर राऊत, भावेश राऊत, गावचे सरपंचा बोरजवाडे, फाउंडेशनचे इतर सर्व सदस्यगण, सर्व गावकरी आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तेजस राऊतला पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.

## लालबागच्या राजाचे, भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळावर वडिलकिचं छत्र

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती दुर्घटनाग्रस्त होऊन दोन गणेशभक्तांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे मंडळावर शोककळा



पसरली आहे. भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळाला लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळातर्फे ११ लाख रुपयांचा मदत निधी देण्यात येणार आहे. तर भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळाचे दिवंगत सचिव संकेत नेवशे आणि दिवंगत ब्रिजेश जोशी यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाकडून ५ लाख रुपयांची मदत निधी जाहीर केलेला आहे. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे , मानद सचिव सुधीर साळवी आणि खजिनदार मंगेश दळवी यांनी संपूर्ण कार्यकारिणीच्या एकमताने केली मदत जाहीर केली आहे.

# ग्रामसभेवर ग्रामसेवकांचा बहिष्कार,

## सलग दुसऱ्यांदा सभा रद्द झाल्याने गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप!

***स्वातंत्र्यदिनी आणि २४ ऑगस्टलाही प्रशासकीय अनुपस्थिती; गावचा विकास ठप्प झाल्याचा ग्रामस्थांचा आरोप, उखर्डा ग्राम पंचायतमध्ये गावकऱ्यांनी नोंदविला निषेध***

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
**धर्मेंद्र शेरकुरे**

तालुक्यातील गट ग्राम पंचायत उखर्डा येथे स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष ग्रामसभा आणि त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी बोलावलेली तहकूब ग्रामसभा, दोन्ही वेळी ग्रामसेवक आणि प्रशासकीय अधिकारी अनुपस्थित राहिल्याने रद्द करण्याची वेळ आली आहे. सलग दुसऱ्यांदा ग्रामसभा न झाल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

१५ ऑगस्टला सभा हुकली, २४ ऑगस्टलाही पाठ दाखवली

नियमानुसार १५ ऑगस्ट रोजी गावच्या विकासावर चर्चा करण्यासाठी ग्रामसभेचे आयोजन करणे बंधनकारक असते. मात्र, त्या दिवशी ग्रामसेवक उपस्थित न राहिल्याने सभा नियमबाह्य ठरवून २४ ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आली होती. त्यानुसार २४ ऑगस्टच्या सभेची रीतसर नोटीस बजावण्यात आली होती.

या नोटीसनंतर गावातील महिला, तरुण आणि वरिष्ठ नागरिक मोठ्या संख्येने ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहिले. मात्र, ठरलेल्या वेळेत ग्रामसेवक किंवा प्रशासक यांपैकी एकही जबाबदार अधिकारी फिरकलाच नाही.

"संप सुरू आहे" - ऐनवेळी उत्तर

गावकऱ्यांनी विचारणा केली असता, 'ग्रामसेवकांचा संप सुरू आहे' असे उत्तर प्रशासनाकडून देण्यात आले. संपाची माहिती



आधीच असताना सभेची नोटीस काढून गावकऱ्यांना नाहक त्रास का दिला? असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

**गावकऱ्यांचे प्रमुख प्रश्न व संताप:**

विकासकामे ठप्प: गावातील रस्ते, पाणी, वीज आणि वैयक्तिक लाभाच्या योजनांचे ठराव ग्रामसभेशिवाय मंजूर होऊ शकत नाहीत. सभाच होत नसल्याने विकासकामे पूर्णपणे थांबली आहेत.

**गावकऱ्यांच्या वेळेचा अपव्यय:**

शेतातली आणि मजुरीची कामे सोडून ग्रामसभेला आलेल्या शेकडो नागरिकांना प्रशासकीय हलगर्जीपणामुळे रिकाम्या हाताने परत जावे लागले.

**प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा:**

"अधिकारी आपल्या मनमानी कारभाराने लोकशाहीचा आणि ग्रामसभेचा अवमान करत आहेत. त्वरित विशेष ग्रामसभा न घेतल्यास तालुका स्तरावर तीव्र आंदोलन छेडू," असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गावच्या कारभारात सुसूत्रता आणण्यासाठी आणि रखडलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी वरिष्ठांनी या प्रकरणात तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

जाणीवपूर्वक १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, २ ऑक्टोबर, १ मे रोजी ग्रामसभा न घेता मग तहकूब ग्रामसभा घेऊन कोरम पूर्ण करू लोकांना ग्रामसभा मध्ये बोलण्याची संधी दिली जात नाही. १५० पेक्षा जास्त गावकरी महिला पुरुष तरुण मोठ्या संख्येने उपस्थित असून देखील ग्रामसेवक व प्रशासक, उपसरपंच कुणीच ग्राम पंचायत मध्ये हजर नव्हते.

गावकऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ७ नुसार गावातील प्रतिष्ठित नागरिकला ग्रामसभेच अध्यक्ष व शासकीय कर्मचारी यांना इतिवृत्त लिहायला लावून ग्रामसभा घेऊ असे ठरले पण ग्राम पंचायत कर्मचारी यांनी ग्रामसभा होऊ दिली नाही. शेतीचे काम सोडून मोठ्या संख्येने गावकरी आपल्या समस्या प्रश्न मांडण्यासाठी उपस्थित होते पण गावकऱ्यांची थट्टा करण्यात आली.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ७ आणि ७अ नुसार १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. ग्रामसेवक, उपसरपंच किंवा प्रशासक अनुपस्थित राहून ग्रामसभा न घेणे किंवा टाळणे हा कायदेशीर व शिस्तभंग आहे तरी ग्रामसेवक उखर्डा हे १५ ऑगस्ट रोजी गावात हजर नव्हते व ग्रामसभा घेतली नाही. प्रत्येक आर्थिक वर्षात १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे आणि २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. ती टाळता येत नाही. तरी सुद्धा ग्रामसभा घेतली जात नाही. यावेळी अभिजित प्रभाकरराव कुडे, वासुदेव डोमकावळे, पुरु महल्ले, सागर ढोके, शुभम हिवरकर, गोविंदा फुलझेले, सूरज उरकुडे, वैभव पुस्देकर, प्रणय देवतळे, तेजस उरकुडे, रवींद्र कुडे, ईश्वर पुसदेकर, रंजीत कुडे असंख्य महिला तरुण गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भू-माफिया व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

आमगाव तालुक्यातील मौजा आमगाव येथील गट क्रमांक ४६०-अ मधील जमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादाला आता गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. या प्रकरणात जैन कुटुंबीयांकडून काही व्यक्तींवर बेकायदेशीरपणे रस्ता दाखवून जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जैन कुटुंबीयांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणीही प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

जैन कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, मौजा आमगाव येथील गट क्रमांक ४६०-अ मधील जमीन ही संतोष धूलचंद जैन व कुटुंबीयांच्या मालकीची असून, त्यासंदर्भात शासकीय अभिलेख, दस्तऐवज, मोजणी, क-प्रत व नकाशे उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, शेजारील गट क्रमांक ४५९ मधील काही व्यक्तींनी गट क्रमांक ४६०-अ मधून रस्ता असल्याचे दर्शवून जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप जैन कुटुंबीयांनी केला आहे.

**नकाशे व कागदपत्रांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह**

गट क्रमांक ४५९ च्या अकृषक



परवानगीच्या प्रक्रियेत गट क्रमांक ४६०-अ मधून रस्ता असल्याचे दर्शविणारे काही नकाशे व प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. हे नकाशे व कागदपत्रे तयार करताना फेरफार अथवा चुकीची माहिती सादर करण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्याची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून उपलब्ध शासकीय अभिलेख, नकाशे, कागदपत्रे तसेच इतर पुराव्यांची पडताळणी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

सीमांकनासाठी उभारलेली संरचना तोडल्याचा आरोप

यापूर्वी गट क्रमांक ४६०-अ च्या सीमांकनासाठी उभारण्यात आलेले सिमेंटचे खांब व इतर संरचना संबंधित व्यक्तींनी सामूहिकरीत्या तोडून जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात १५ मे २०२६ रोजी आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती, असे पत्रात नमूद आहे.

दरम्यान, २१ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा गट क्रमांक ४६०-अ मध्ये प्रवेश करून सीमांकनाची संरचना तोडून रस्ता करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी जैन कुटुंबातील सदस्य अनिकेत जैन यांनी घटनास्थळी जाऊन संबंधितांना असे करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानंतर त्यांच्यावर समूहातील व्यक्तींनी मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली असून, घटनेनंतर अनिकेत जैन यांनी आमगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे.

**कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण**

या प्रकारामुळे जैन कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित व्यक्तींकडून वारंवार दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन जैन कुटुंबीयांना तातडीने पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, संघटित स्वरूपात गुंडगिरी, धमकी, मारहाण, जमीन बळकावण्याचा प्रयत्न अथवा बनावट कागदपत्रांचा वापर झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध लागू कायद्यांनुसार कठोर फौजदारी कारवाई करावी. प्रकरणातील परिस्थिती व पुरावे लक्षात घेऊन मोक्का अंतर्गत कारवाईची शक्यता तपासावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**अनिकेत जैन यांच्यावर तिघांकडून मारहाणीचा आरोप; जैन कुटुंबीयांना तातडीने पोलीस संरक्षण देण्याची मागणी**

**राजकीय दबावाशिवाय निष्पक्ष चौकशीची मागणी**

या प्रकरणात कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता उपलब्ध शासकीय अभिलेख, नकाशे, कागदपत्रे, सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब यांच्या आधारे निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जैन कुटुंबीयांनी केली आहे. दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुद्ध दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, जमीन मालकीहक्क, सीमांकन, रस्त्याचा प्रश्न आणि कथित मारहाणीच्या घटनेमुळे हे प्रकरण आता अधिक गंभीर बनले आहे. त्यामुळे प्रशासन व पोलीस यंत्रणा या प्रकरणाची कोणती भूमिका घेते आणि चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे आमगाव परिसराचे लक्ष लागले आहे.

## ईद-ए-मिलाद, पोळा व गणेशोत्सव शांततेत साजरे करा : पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे

**आमगाव पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक; सण-उत्सवांमध्ये सलोखा व बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहन**

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आगामी काळात तालुक्यात साजरे होणारे ईद-ए-मिलाद, पोळा, गणेशोत्सव तसेच इतर सण व उत्सव शांततेत, उत्साहात आणि सलोख्याच्या वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन आमगावचे पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांनी केले. आमगाव पोलीस ठाण्याच्या कार्यालयातील सभागृहात आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे होते. यावेळी शांतता समितीचे सदस्य



तसेच विविध घटकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आमगाव तालुक्यात विविध धर्मांचे सण व उत्सव परस्परांमध्ये बंधुभाव, सलोखा आणि शांतता राखून साजरे करण्याची परंपरा आहे. ही सामाजिक एकोपा आणि शांततेची परंपरा यापुढेही कायम ठेवण्याची गरज असल्याचे पोलीस निरीक्षक कुकडे यांनी सांगितले.

आगामी काळात ईद-ए-मिलाद, पोळा आणि गणेशोत्सव हे महत्त्वाचे सण साजरे होणार आहेत. या सणांच्या काळात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. सण-उत्सव हे सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचे माध्यम असून, सर्व समाजघटकांनी एकमेकांच्या धार्मिक भावना व परंपरांचा आदर करावा. उत्सव साजरा करताना प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे आणि शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शांतता समितीच्या सदस्यांनीही आगामी सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. बैठकीदरम्यान विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. कोणत्याही अफवा अथवा गैरसमजांना बळी न पडता सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले.

ईद-ए-मिलाद, पोळा आणि गणेशोत्सव या सणांना कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने व संयमाने वागावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. या बैठकीस शांतता समितीचे सदस्य इसुलाल भालेकर, संपतलाल सोनी, देवकांत बहेकार, प्रभादेवी उपराडे, छबुताई उके, योगेश रामटेके, दिलीप कन्नमवार इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार महिला पोलीस कर्मचारी सत्यशीला छिपे यांनी केले.

# एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधर बॅचला निरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबईच्या बल्लारपूर आवारातील २०२३-२०२६ या कालावधीतील पहिल्या पदवीधर बॅचचा निरोप समारंभ २१ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे बल्लारपूर आवाराच्या शैक्षणिक वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा अधोरेखित झाला.

कार्यक्रमाला बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले, उपकुलसचिव डॉ. बाळू राठोड आणि समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी



पदवीधर विद्यार्थिनींना पुढील शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मार्गदर्शन करताना डॉ. राजेश इंगोले यांनी बल्लारपूर आवाराच्या पहिल्या पदवीधर बॅचचे कौतुक केले. आवाराच्या उभारणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी आता पदवीधर होऊन विविध क्षेत्रांत स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी पुढे जात असल्याबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला. विद्यार्थिनींनी ज्ञान, कौशल्य आणि संस्कारांचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. बाळू राठोड यांनी पहिल्या बॅचसोबत जोडलेल्या आठवणींना उजाळा देत या विद्यार्थिनींचे विद्यापीठाच्या इतिहासात कायमस्वरूपी स्थान राहणार असल्याचे सांगितले. आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक दृष्टिकोन ही मूल्ये आयुष्यभर जपण्याचे आवाहन त्यांनी केले. डॉ. वेदानंद अलमस्त यांनीही विद्यार्थिनींना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून तीन वर्षांच्या शैक्षणिक प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. नवीन कॅम्पसमध्ये प्रवेश घेतानाची उत्सुकता, मैत्रिणी, शिक्षकांचे मार्गदर्शन, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम, क्रीडा स्पर्धा आणि कॅम्पसमधील आनंदाचे क्षण यांचा उल्लेख करताना अनेक विद्यार्थिनी भावूक झाल्या. बल्लारपूर आवाराने केवळ पदवीचे शिक्षण न देता आत्मविश्वासाने स्वप्ने पाहण्याची व ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिल्याचे विद्यार्थिनींनी सांगितले. समारंभात गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. अकॅडमिक एक्सलन्स अवॉर्ड (२०२३-२०२६) रिया जयकिशन तिलोकानी हिला प्रदान करण्यात आला. तसेच २०२३-२०२६ बॅचची सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून गुंजा सुकरू निषाद हिचा विशेष सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्रुती कांबळे, रिया तिलोकानी, पूनम शर्मा आणि काशिश अलोने यांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून सहाध्यायी व शिक्षकांना भावनिक निरोप दिला. क्रीडा व मनोरंजक उपक्रमांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता यादव, फरहाद शेख आणि अनुष्का ठाकूर यांनी केले. क्रीडा उपक्रमांचे संचालन झैनब शेख व जोया खान यांनी केले. श्रुती टेंभुर्णे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका अश्विनी वाणी, अपेक्षा पिंपळे, शीतल बिल्लोरे तसेच प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.बल्लारपूर आवारातील पहिली पदवीधर बॅच आता पदवी घेऊन नव्या वाटचालीला सुरुवात करीत आहे. त्यामुळे हा निरोप समारंभ केवळ एका बॅचला दिलेला निरोप न ठरता बल्लारपूर आवाराच्या शैक्षणिक प्रवासातील पहिल्या यशस्वी अध्यायाचा भावपूर्ण उत्सव ठरला.

थोडक्यात

## रामटेकच्या डॉ. प्रभात खेडगरकर यांनी सेमीकंडक्टर क्षेत्रात गाठली मोठी उंची

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेकचे डॉ. प्रभात दुर्गेश्वर खेडगरकर यांनी सेमीकंडक्टर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शहराचे नाव आंतरराष्ट्रीय



स्तरावर उज्ज्वल केले आहे. त्यांनी भारतीय तंत्रज्ञान संस्था, रोपड येथून सेमीकंडक्टर क्षेत्रात पीएच.डी. पूर्ण केली आहे. स्पेन येथे आयोजित युरोसिस-२०२६ व्हीएलएसआय कार्यशाळा व सिलिकॉन इंटिग्रेशन आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांच्या संशोधन निबंधाचे प्रकाशन झाले आहे. या प्रतिष्ठित परिषदेत जगभरातील वैज्ञानिक, संशोधक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. अशा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर डॉ. खेडगरकर यांच्या संशोधन निबंधाचे प्रकाशन होणे ही रामटेकसाठी अभिमानाची बाब आहे.

डॉ. प्रभात खेडगरकर यांनी प्राथमिक शिक्षण श्रीराम प्राथमिक शाळेतून घेतले. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण राष्ट्रीय आदर्श विद्यालय, रामटेक येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी केआयटीएस अभियांत्रिकी महाविद्यालय, रामटेक येथून इलेक्ट्रॉनिक्स शाखेत बी.ई. पदवी प्राप्त केली. त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत कार्य केले. पुढे राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, हमीरपूर येथून व्हीएलएसआयमध्ये एम.टेक. तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था, रोपड येथून सेमीकंडक्टर क्षेत्रात पीएच.डी. प्राप्त केली. सध्या ते अमेरिकेतील जी.एफ. बेंगळुरू कंपनीत संशोधक म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करतात. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात गुंजन बिरणवार हिचे घवघवीत यश!



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक तालुकास्तरीय अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात नंदीवर्धन विद्यालय, नगरधन येथील इयत्ता ९ वी ची विद्यार्थिनी कु. गुंजन खेमराज बिरणवार हिने 'भारतीय ऊर्जा क्षेत्र - २०४७ : भवितव्य आणि आव्हाने' या विषयावर उत्कृष्ट व प्रभावी सादरीकरण करून रामटेक तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आणि जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी पात्र ठरली. गुंजन हिने आपल्या सादरीकरणातून भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील भविष्यातील संधी, अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा बचत, आधुनिक तंत्रज्ञान तसेच भविष्यातील आव्हाने यांचा प्रभावीपणे ऊहापोह केला. तिच्या अभ्यासपूर्ण मांडणीला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. या उल्लेखनीय यशाबद्दल नंदीवर्धन विद्यालयाच्या वतीने कु. गुंजन बिरणवार हिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक भूतकर सर , मार्गदर्शक शिक्षक संजीव शेंदरे सर, युवराज बारस्कर सर यांनी गुंजनचे कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गुंजनच्या या यशामुळे नंदीवर्धन विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थी, शाळेचे सर्व शिक्षक, पालक व नंदीवर्धन विद्यालय परिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## तिडके कनिष्ठ महाविद्यालयात शालेय विद्यार्थी मंत्रीमंडळ स्थापन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शाळेमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ महाविद्यालय असावे याच उद्देशाने श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथे आज शालेय विद्यार्थी मंत्री मंडळ करीता मतदान घेण्यात आले यात एकूण ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता आणि जवळपास सर्वांचा चांगली मते मिळाली परंतु याधून शालेय मुख्यमंत्री म्हणून वंशिका भोयर हिची निवड झाली तर मोहीत वाघाडे - उप मुख्यमंत्री, प्रियांशु डबले - अभ्यास मंत्री, श्वेता शिवरकर - सांस्कृतिक मंत्री, तेजू सायरे - स्वच्छता मंत्री, दुर्गेश बोरसरे - पर्यावरण मंत्री, अंश कोकोडे - क्रीडा मंत्री, सिमरन कठोते - स्वागत मंत्री, जयेश लारोकर - पर्यटन मंत्री म्हणून विजयी झाले.

या कार्यक्रमाचे नियोजन व संचालक प्रा सुभाष सेलोकर यांनी केले तर आभार प्रा. किशोर धांडे यांनी मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सरिता सिंग यांनी भूषविले यासोबतच व्यासपीठावर प्रा. रुपेश हातग्रे, प्रा. तुलसीदास वाघमारे, प्रा. गणेश मरठे, प्रा. अंजली बडवाईक, प्रा. महेश्वरी हातझाडे उपस्थित होते. सर्व विजयी विद्यार्थ्यांना पाहुण्याच्या हस्ते रोपटे देऊन गौरव करण्यात आला. तसेच सर्वांना महाविद्यालय कार्य काय राहणार आहे याबाबत सविस्तर माहिती प्रा. सुभाष सेलोकर यांनी दिली.

## केरळमध्ये सरासरीपेक्षा २३ टक्के कमी पाऊस

**कोच्ची :** केरळमध्ये यंदाच्या मोसमात पावसाने ओढ दिली असून १ जून ते २४ ऑगस्ट या कालावधीत राज्यात सरासरीपेक्षा २३ टक्के कमी पाऊस झाला आहे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, या कालावधीत केरळमध्ये १,६७१.४ मिमी पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात १,२७८.७ मिमी पावसाची नोंद झाली. राज्यातील जिल्ह्यांचा विचार केला असता कन्नूर, कासरगोड, कोट्टायम, कोझिकोड, पथनमथिट्टा आणि तिरुवनंतपुरम या जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण सामान्य राहिले.

# सीजेपीची पुन्हा दिल्लीत धडक

## शिक्षक दिनीच इंडिया गेटपासून मोर्चा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

नीट पेपरफुटी आणि परीक्षांच्या मुद्द्यांवरुन दिल्लीच्या जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीने बेमुदत आंदोलन केल्यानंतर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी, केंद्र सरकारच्यावतीने सीजेपीला काही आश्वासनं देण्यात आली होती. संबंधित आंदोलनावेळी विद्यार्थ्यांवर दाखल गुन्हे मागे घेण्याचंही आश्वासन देण्यात आलं. मात्र, सरकारने आश्वासन पाळलं नसल्याचे सांगत सीजेपी पुन्हा एकदा आंदोलनाच्या तयारीत आहे.

दुसरीकडे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी स्कुल ठीक करो अभियान सुरू केलं असून सरकारची शाळांची दूरवस्था पाहून संताप व्यक्त केला आहे.



त्याच पार्श्वभूमीवर आता सीजेपीने ५ सप्टेंबर म्हणजेच शिक्षक दिनी आंदोलनाची घोषणा केली आहे.

सीजेपीकडून ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत शांततापूर्ण मोर्चाची घोषणा करण्यात आली असून २५ जुलैला सरकारने दिलेली आश्वासने पाळली नसल्याचे सीजेपीने म्हटलं आहे. त्यामुळे, इंडिया गेटपासून नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत कॉकरोच जनता पार्टीच्यावतीने मोर्चा काढण्यात येणार आहे. नीट पीडितांच्या कुटुंबीयांसह पोलिसांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या, पोलीस अत्याचाराचे पीडित कुटुंबीय या मोर्चाचे नेतृत्व करणार आहे. १८ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने एफआयआरची यादी मागूनही सरकारने स्पष्ट आश्वासन दिले नसल्याचा दावा सीजेपीच्यावतीने करण्यात आला आहे. सरकारने विद्यार्थ्यांना आणि सीजेपीच्या शिष्टमंडळाला दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी कॉकरोच जनता पार्टीने केली आहे. दरम्यान, विद्यार्थी, युवा संघटना आणि देशभरातील तरुणांनी ५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचं आवाहन देखील करण्यात आलं आहे.

सीजेपीने म्हटले आहे की, १८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे विद्यार्थी आणि आंदोलकांविरुद्ध दाखल केलेल्या सर्व एफआयआरच्या यादीची मागणी केली होती. पक्षाचा दावा आहे की, न्यायालयाने कलम १४२ अंतर्गत हे खटले रद्द करण्याचा विचार करायला हवा होता. केंद्र सरकारने एफआयआरची यादी देण्याचे स्पष्ट आश्वासन दिलेले नाही, असा सीजेपीचा आरोप आहे. आंदोलन संपण्यापूर्वी दिलेल्या आश्वासनांवरून सरकारने माघार घेतल्याचे हे लक्षण आहे, असा पक्षाने अर्थ लावला आहे. सीजेपी नेते सौरभ दास आणि रत्ना सिंह यांनी म्हटले आहे की, आंदोलन संपल्यानंतर सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करावीत. सर्व एफआयआर मागे घ्यावेत आणि शांततापूर्ण आंदोलकांवरील कारवाई थांबवावी.

### जयपूरमधील सरकारी शाळेत हिंसाचार

दुसरीकडे, सीजेपीच्या "शाळा दुरुस्त करा" मोहिमेदरम्यान जयपूरमधील रामपुरा-कंवरपुरा गावात पक्षाच्या कार्यकर्त्यांवर हिंसाचार झाला. सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी मागणी केली आहे की, राजस्थान सरकारने एफआयआरवर कारवाई करावी आणि हिंसाचारात सामील असलेल्यांना अटक करावी. त्यांनी सांगितले की, सीजेपी कार्यकर्त्यांविरुद्ध पुरावे आढळल्यास पक्षावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

## सायबर सुरक्षा जनजागृती सत्राला ज्येष्ठांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त प्रो. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरीच्या वतीने सिटीझन सायन्स सिरीजचा शुभारंभ सायबर सुरक्षा आणि जनजागृती या विषयावरील कार्यशाळेद्वारे करण्यात आला. या संवादात्मक सत्रात सुमारे ४० ज्येष्ठ नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला.

सायबर सेल, नागपूर शहर पोलीसच्या सायबर टेक्निकल मेंबर व महिला हेड कॉन्स्टेबल श्रद्धा धोमणे यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांन ऑनलाइन फसवणुकीचे विविध प्रकार समजावून सांगितले. तसेच,



फिशिंग कॉल, युपीआय घोटाळे, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी तसेच डिजिटल विश्वात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. सायबर फसवणुकीची तक्रार कुठे व कशी नोंदवावी, तसेच महत्त्वाच्या हेल्पलाइन क्रमांकांची माहितीही त्यांनी दिली.

पीआरएसएसईच्या संचालक डॉ. सीमा उबाळे यांनी त्यांचे स्वागत केले. सध्याच्या डिजिटल युगात, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरतेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. सहभागी नागरिकांनी विविध प्रश्न विचारण्यासोबतच आपले अनुभवही मांडले.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री निकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ हॉरायझन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या कौशल्य विकास विभागातर्फे गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. ही कार्यशाळा प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर यांच्या अध्यक्षतेत पार पडली. रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. मधुकर मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षक श्रीमती अश्विनी भुजोणे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून सोप्या पद्धतीने गणेशमूर्ती बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. कार्यशाळेचे आयोजन डॉ. सुरेखा गुडधे यांनी केले. त्यांना सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## आमगावचा भाजीबाजार समस्यांच्या विळख्यात

***चिखल, खड्डे आणि अस्वच्छतेने व्यापारी-ग्राहक त्रस्त, मूलभूत सुविधांचा अभाव; पावसाळ्यात रस्त्यांना चिखलाचे स्वरूप, कृषी उत्पन्न बाजार समितीचा नगरपरिषदेवर दुर्लक्षाचा आरोप***

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव शहरासह संपूर्ण तालुक्यातील नागरिकांची दररोज मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेल्या भाजीबाजार परिसरात सध्या विविध समस्यांनी उग्र रूप धारण केले आहे. बाजार परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे, पावसाचे साचलेले पाणी, चिखल, दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे व्यापारी तसेच ग्राहक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. पावसाची साधी सर आली तरी बाजार परिसरातील रस्त्यांवर पाणी साचून सर्वत्र चिखलाचे साम्राज्य निर्माण होत असल्याने भाजीपाला खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

आमगाव शहरातील भाजीबाजार हा नागरिकांच्या दैनंदिन गरजांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. शहरासह तालुक्यातील विविध गावांमधून नागरिक येथे भाजीपाला खरेदीसाठी येतात. बाजार परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. तसेच या भागात शाळा, महाविद्यालये, बँका, व्यापारी प्रतिष्ठाने आणि विविध व्यवसायांची केंद्रे असल्याने दिवसभर मोठी गर्दी असते.

मात्र, एवढ्या महत्त्वाच्या बाजारपेठेची रस्ते आणि स्वच्छता व्यवस्थेअभावी दुरवस्था झाली आहे. बाजार परिसरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी या खड्डयांमध्ये साचत असल्याने वाहनचालकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकीस्वार तसेच पादचाऱ्यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. चिखलामुळे बाजारात येणाऱ्या नागरिकांना चालणेही कठीण होत आहे.

### पावसात बाजारपेठेचे रूपांतर चिखलाच्या दलदलीत

पावसाळ्यात या समस्येची तीव्रता आणखी वाढते. बाजार परिसरात पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी अनेक ठिकाणी तासन्तास साचून राहते. साचलेल्या पाण्यामुळे रस्त्यांची अवस्था अधिकच खराब होते आणि सर्वत्र चिखल निर्माण होतो. त्यामुळे भाजीपाला विक्रेत्यांना आपला माल सुरक्षित ठेवणे कठीण जाते, तर ग्राहकांना चिखलातून वाट काढत खरेदी करावी लागते.

साचलेल्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण होत असून अस्वच्छतेचे वातावरण तयार झाले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. बाजार परिसरात नियमित स्वच्छता आणि पाणी निचऱ्याची प्रभावी



व्यवस्था करण्याची गरज असतानाही संबंधित प्रशासनाकडून अपेक्षित उपाययोजना होत नसल्याची नाराजी व्यापारी व नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### बाजार समितीचा नगरपरिषदेवर आरोप

दरम्यान, भाजीबाजाराचा परिसर नगरपरिषद हद्दीत येत असल्याने या परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी नगरपरिषदेने घ्यावी, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून करण्यात आली आहे. बाजार समितीकडून नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात कर अदा केला जात असतानाही रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप बाजार समितीने केला आहे.

बाजार समितीच्या माध्यमातून या परिसरातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असतानाही व्यापारी आणि ग्राहकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून बाजार परिसरातील नागरिकांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी बाजार समितीकडून करण्यात आली आहे.

### व्यापारी आणि ग्राहकांमध्ये नाराजी

भाजीबाजारातील खराब रस्त्यांमुळे व्यापाऱ्यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बाजारात भाजीपाला घेऊन येणारी वाहने चिखलात अडकण्याची तसेच खड्डयांमुळे नुकसान होण्याची शक्यता असते. ग्राहकांची संख्या कमी होण्याचा परिणामही व्यवसायावर होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

दुसरीकडे, बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना चिखल व साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे बाजार परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती, पाणी निचरा व्यवस्था आणि नियमित स्वच्छता याबाबत प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### लाखोंची उलाढाल, सुविधांचा मात्र अभाव

आमगावच्या भाजीबाजारात दररोज मोठ्या प्रमाणात व्यवहार होत असून, या बाजारपेठेच्या माध्यमातून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे सांगितले जाते. मात्र, एवढी आर्थिक उलाढाल असलेल्या बाजारपेठेला आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

बाजारपेठेतील रस्ते व्यवस्थित असणे, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी निचरा व्यवस्था असणे, नियमित स्वच्छता होणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ आरोप-प्रत्यारोप न करता संबंधित यंत्रणांनी समन्वयाने या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**मुख्याधिकारी प्रमोद कांबळे यांचे स्पष्टीकरण**

मुख्य भाजी बाजारपेठेतील हा रस्ता सध्या अत्यंत खराब झाला आहे. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात चुरी (मलमा) टाकण्याचे काम करण्यात येत आहे. या रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी निधी नियोजनात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या पाच ते सहा महिन्यांत या रस्त्याची दुरुस्ती करण्यात येईल.

**- प्रमोद कांबळे, मुख्याधिकारी, नगरपरिषद आमगाव**

### तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

आमगाव भाजीबाजारातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, खड्डे बुजवावेत, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी, बाजार परिसराची नियमित स्वच्छता करावी आणि व्यापारी व ग्राहकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी व्यापारी, ग्राहक तसेच बाजार समितीकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास भविष्यात मोठी दुर्घटना किंवा आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.